रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक ३१७
www.ramprahar.com

बुधवार, ४ जून २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

झेनिथ वॉटरफॉलवर दुर्घटना रोखण्यासाठी उपाययोजना/२

'प्रशासन व विक्रम संघटनेच्या चर्चेतून योग्य निर्णय व्हावा'/५

पॉवरलिफ्टिंग राज्य इक्विपड स्पर्धेत रायगडला विजेतेपद/८

## वाशी-मानखुर्द नवीन खाडीपुलाचे उद्या उद्घाटन



**नवी मुंबई :** सायन-पनवेल मार्गावरील वाशी खाडीपुलावरून मुंबईच्या दिशेने प्रवास करणाऱ्या वाहनचालकांसाठी आनंदाची बातमी आहे. वाशीकडून मानखुर्द दिशेला येणाऱ्या पुलाचे काम पूर्ण झाले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ५ जूनला या ब्रिजचे उद्घाटन होणार आहे. मानखुर्द आणि नवी मुंबईला जोडण्यासाठी वाशी खाडीवर सहा पदरी पूल आहे, जो १९९४मध्ये वाहतुकीला सुरू करण्यात आला होता, मात्र या रस्त्यावरील वाहतूक गेल्या काही वर्षात वाढली. त्यामुळे हा पूल अपुरा पडत आहे. परिणामी वाशी टोल नाका भागात वाहनांना मोठ्या वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागत होते. मानखुर्दहून वाशीकडे जाणाऱ्या वाहनांसाठी उभारण्यात येणारा पूल ऑक्टोबरमध्ये वाहतुकीसाठी खुला करण्यात आला होता. आता वाशीकडून मानखुर्द दिशेला येणाऱ्या वाहनांसाठी उभारण्यात येणाऱ्या पुलाचेही काम पूर्ण झाले आहे.

### पावसामुळे झालेल्या नुकसानीचा मंत्रिमंडळ बैठकीत आढावा

# कापणी झालेल्या पिकांसाठी भरपाई

### ▌मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील विविध भागात नुकत्याच झालेल्या पावसामुळे कापणी केलेल्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. अशा शेतकऱ्यांना भरपाई देण्याबाबत विचार केला जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

राज्य मंत्रिमंडळाची बैठक मंगळवारी (दि. ३) सह्याद्री अतिथीगृह येथे झाली. या बैठकीच्या सुरुवातीला राज्यात झालेल्या पावसामुळे झालेल्या नुकसानीचा आढावा घेतला गेला. या वेळी विविध मंत्र्यांनी कापणी केलेल्या पिकांचे नुकसान झाल्याचा मुद्दा मांडला. त्याची मुख्यमंत्र्यांनी दखल घेतली.

मदत व पुनर्वसन विभागाच्या प्रधान सचिव सोनिया सेठी यांनी सादरीकरणाद्वारे नुकसानीचा आणि मदतीची माहिती दिली. त्यांनी सांगितले की, राज्य मंत्रिमंडळाच्या २७ मे रोजी झालेल्या बैठकीत घरांच्या पडझडींच्या दुरूस्ती आणि पुनर्बांधणीकरिता तातडीने मदतीनिधी द्यावा, अशा सूचना केल्या होत्या. त्यानुसार ४९ कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यात आला आहे. कोकण विभागास पाच कोटी, पुणे विभाग १२ कोटी, नाशिक पाच कोटी, छत्रपती संभाजीनगर १२ कोटी, अमरावती पाच कोटी आणि नागपूर विभागास १० कोटी असे एकूण ४९ कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत.



याचबरोबर खरीप २०२५ आणि यापुढील कालावधीकरिता केंद्र अथवा राज्य शासनाने अधिसूचित केलेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतीपिकांच्या नुकसानीपोटी द्यावयाची भरपाई दर आणि निकष २७ मार्च २०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार देय राहतील. यामुळे १ जानेवारी २०२४च्या शासन निर्णयानुसार दिलेल्या सूचना अधिक्रमित करण्यात आल्या आहेत.

या वेळी वनमंत्री गणेश नाईक आणि बंदरे विकासमंत्री निलेश राणे यांनी पावसामुळे सुक्या मासळीचे नुकसान झाले असल्याचे सांगून मच्छिमारांना नुकसानभरपाई देण्याची मागणी केली. यावर मदत व पुनर्वसन विभागाने यावर प्रस्ताव सादर करावा, अशी सूचना मुख्यमंत्री फडणवीस यांनी केली.

सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी रस्ते आणि छोट्या पुलांची दुरूस्ती केली जावी, असे सांगितले, तर ग्रामीण भागातील रस्ते दुरूस्ती करण्यासाठी सूचना द्याव्यात, अशी मागणी पर्यटनमंत्री शंभूराज देसाई यांनी केली. यावर गेल्या पंधरा दिवसांत ज्या भागात रेड अलर्ट घोषित केला होता तेथील रस्ते आणि पुल दुरूस्तीबाबत विचार केला जावा, असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

### राज्यातील पाणीटंचाई परिस्थितीत सुधारणा

*राज्यातील पाणीटंचाईच्या परिस्थितीमध्ये सुधारणा झाली आहे. गेल्या आठवड्याच्या तुलनेत टँकरने पाणीपुरवठा करण्याच्या गावांच्या संख्येत २००ने, तर टँकरच्या संख्येत ३३६ने घट झाली आहे. छत्रपती संभाजीनगर आणि जालना या दोन जिल्ह्यांमध्ये टँकरने पाणीपुरवठा सुरू आहे, असे पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे यांनी या वेळी सांगितले.*



# साहित्यिकांप्रति मी कृतज्ञ!

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे उद्गार

### 'कोमसाप'तर्फे कविसंमेलन, परिसंवाद, सन्मान पुरस्कार आणि अभीष्टचिंतन सोहळा उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माझ्या आयुष्यात साहित्यिकांनी मला साहित्य रूपाने भरभरून दिले. त्यामुळे मी त्यांचा कृतज्ञ आहे, असे उद्गार माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी त्यांच्या वाढदिवसानिमित्त कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल शाखेच्या वतीने आयोजित 'एक कृतार्थ संध्याकाळ' या साहित्यिक कार्यक्रमात काढले.

या वेळी पनवेल शहरातील विरुपाक्ष मंगल कार्यालयाच्या सभागृहात कविसंमेलन, लोकनेते रामशेठ ठाकूर एक बहुआयामी व्यक्तिमत्व परिसंवाद, सन्मान गौरव आणि अभीष्टचिंतन असा भरगच्च सोहळा उत्साहात झाला.

या सोहळ्यास कोमसापचे संस्थापक अध्यक्ष पद्मश्री मधु मंगेश कर्णिक, कवी, चित्रपट निर्माते, दिग्दर्शक रामदास फुटाणे, सुप्रसिद्ध कवी अशोक नायगावकर, सुप्रसिद्ध साहित्यिक अरुण म्हात्रे, आमदार विक्रांत पाटील, माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील, काँग्रेसचे रायगड जिल्हा अध्यक्ष महेंद्र घरत, कोमसापचे जनसंपर्क प्रमुख प्रा.एल.बी. पाटील, रायगड अध्यक्ष सुधीर शेठ, नवीन पनवेल शाखेचे अध्यक्ष गणेश कोळी उपस्थित आदी होते.

पुढे बोलताना लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणाले की, पनवेलमध्ये चांगले साहित्यिक आहेत आणि त्यांच्या रूपाने चांगले साहित्य वाचण्यासाठी पनवेलकरांना मिळत आहे. आपले जीवन कशासाठी आहे याची ओळख असणे गरजेचे असते आणि आपण ज्यांच्याकडून घडत गेलो त्याची जाणीवही तेवढीच महत्त्वाची असते. आपल्याकडून जेवढे होईल तेवढे सामाजिक कार्य करीत रहायचे, असे सांगतानाच मी साहित्यिकांच्या ऋणात राहणे पसंत करत असून आपल्या साहित्यिक उपक्रमांसाठी मी तुमच्यासोबत सदैव असेन, असेही त्यांनी अधोरेखित केले.

कोमसापचे संस्थापक अध्यक्ष मधु मंगेश कर्णिक यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर हे साहित्यप्रेमी असून समाजामध्ये त्यांचे खूप मोठे कार्य असल्याचे सांगून ते अमृत महोत्सवी वर्षात पाऊल टाकल आहेत. त्यांनी शतायुषी व्हावे, अशा शुभेच्छा दिल्या. ते पुढे म्हणाले की, लोकनेते रामशेठ ठाकूर हे रत्न बहुगुणी, बहुआयामी आहे. साधी रहाणी आणि सरळ व्यक्तिमत्वाचे गोव्याचे माजी मुख्यमंत्री बांदोडकर होऊन गेले, त्याचप्रमाणे रायगडला रामशेठ ठाकूर यांच्या रूपाने साधे, सरळ, पण उच्च विचारसरणीचे व्यक्तिमत्व लाभले आहे. (पान २ वर..)

## विविध रुग्णालयांना जमीन देण्यास मान्यता

छत्रपती संभाजीनगर येथे राज्य कामगार विमा योजनेच्या रूग्णालयासाठी १५ एकर जमीन देण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. यासह बिबवेवाडी (पुणे), अहिल्यानगर, सांगली, अमरावती, बल्लारपूर (चंद्रपूर), सिन्नर (नाशिक), बारामती (पुणे), सातारा आणि पनवेल (रायगड) येथील प्रस्तावित रूग्णालयांसाठीही शासकीय जमीन उपलब्ध करून देण्यास तत्वतः मान्यता देण्यात आली.

छत्रपती संभाजीनगर शहरातील औद्योगिक विस्तार आणि वाढत्या कामगारवर्गाच्या आरोग्य गरजांचा विचार करून कर्मचारी राज्य विमा निगमचे) २०० खाटांचे रुग्णालय उभारण्यात येणार आहे. यासाठी करोडी येथील १५ एकर गायरान जमीन देण्यास या बैठकीत मान्यता देण्यात आली.

दरम्यान, महाराष्ट्रातील अन्य नऊ ठिकाणी अशी रुग्णालये उभारण्याचे प्रस्तावित आहे. त्यानुसार विबवेवाडी (पुणे), अहिल्यानगर, सांगली, अमरावती, बल्लारपूर (चंद्रपूर), सिन्नर (नाशिक), बारामती (पुणे), सातारा आणि पनवेल (रायगड) येथील रुग्णालयांना आवश्यक जमीन उपलब्ध करून देण्यास तत्वतः मान्यता देण्यात आली.

## अनुसूचित जमाती आयोगाची स्थापना

महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोगाची स्थापन करण्यास तसेच आयोगासाठी पदनिर्मिती, जागा व अनुषंगिक खर्चास मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली.

केंद्रीय स्तरावर देशात अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्याकरिता दोन स्वतंत्र आयोग आहेत. या दोन्ही आयोगांशी निगडीत विषय वेगेवगळे आहेत. त्यामुळे दोन स्वतंत्र आयोग असणे आवश्यक आहे तसेच ५१व्या जनजाती सल्लागार परिषदेत महाराष्ट्र राज्यात स्वतंत्र अनुसूचित जमाती आयोग स्थापन करण्याची शिफारस करण्यात आली होती. त्यानुसार हा आयोग स्थापन करण्यात येत आहे.

दरम्यान, अनुसूचित जाती आयोगदेखील स्वतंत्रपणे कार्यरत राहणार आहे. या दोन्ही आयोगांना वैधानिक दर्जा मिळावा यासाठी मंत्रिमंडळाने तत्वतः मान्यता दिली. त्यासाठीही आगामी काळात कार्यवाही करण्यात येणार आहे.

## निवडक

### वैष्णो देवी ते काश्मीरपर्यंत धावणार वंदे भारत ट्रेन

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी ६ जून रोजी श्रीनगर ते कटरा या दोन वंदे भारत ट्रेन्सना हिरवा झेंडा दाखवणार आहेत. त्यामुळे वैष्णो देवी ते काश्मीरपर्यंत आता वंदे भारत ट्रेन धावेल. २२ एप्रिल रोजी झालेल्या पहलगाम हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तान आणि पाकव्याप्त जम्मू आणि काश्मीर (पीओके)मध्ये ऑपरेशन सिंदूरद्वारे चोख प्रत्युत्तर दिले. त्यानंतरचा हा पंतप्रधानांचा पहिलाच जम्मू आणि काश्मीर दौरा असेल.

### एकाच कुटुंबातील चार मुलींचा नदीत बुडून मृत्यू

**आग्रा :** उत्तर प्रदेशमधील आग्रा जिल्ह्यात यमुना नदीत बुडून एकाच कुटुंबातील चार मुलींचा मृत्यू झाला, तर दोन मुलींची प्रकृती गंभीर आहे. त्यांना उपचारांसाठी एसएन मेडिकल कॉलेजमध्ये दाखल करण्यात आले आहे. ही घटना सिकंदरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील स्वामी नगला गावाजवळ घडली. वाढत्या उकाड्यापासून दिलासा मिळावा यासाठी या मुली यमुना नदीच्या किनाऱ्यावर पोहचल्या होत्या.

## युद्धात नुकसानापेक्षा निकाल महत्त्वाचा असतो -सीडीएस अनिल चौहान



**पुणे : प्रतिनिधी**

भारताचे संरक्षण प्रमुख (सीडीएस) जनरल अनिल चौहान यांनी पुणे विद्यापीठात भविष्यातील युद्ध आणि युद्धनीती या विषयावर आयोजित केलेल्या भाषणात ऑपरेशन सिंदूरबद्दल माहिती सांगितली. या वेळी त्यांनी दहशतवादाला आळा घालण्यासाठी पाकिस्तानला स्पष्ट इशारा दिला तसेच युद्धात नुकसानापेक्षा निकाल महत्त्वाचा असतो, असे नमूद केले.

जनरल चौहान म्हणाले, ऑपरेशन सिंदूर हे युद्ध रणनीतीचे एक उदाहरण होते, ज्यामध्ये कायनॅटिक आणि नॉन-कायनॅटिक युद्ध कौशल्यांचा वापर केला गेला. या युद्धादरम्यान तीन ट्रेंड उदयास आले, जे भविष्यातील युद्धाची रूपरेषा निश्चित करतील. पहिला ट्रेंड म्हणजे या युद्धादरम्यान सेन्सर तंत्रज्ञान खूप महत्त्वाचे होते. आपल्याकडे नैसर्गिक आणि मानवनिर्मित दोन्ही सेन्सर्स आहेत. दुसरा ब्रह्मोससारख्या हायपरसोनिक क्षेपणास्त्रांनी आणि स्टेल्थ तंत्रज्ञानाने युद्धात खूप महत्त्वाची भूमिका बजावली. तिसऱ्या ट्रेंडमध्ये मानवरहित प्रणाली, स्वायत्त प्रणालींचा समावेश असून यामुळे भविष्यातील युद्धांमध्ये मानवी धोका कमी होईल.

ऑपरेशन सिंदुरवरून असे दिसून येते की युद्ध हे केवळ एक हल्ला नाही, तर राजकारणाचा एक भागदेखील आहे. ऑपरेशन सिंदूरमध्ये युद्ध आणि राजकारण एकाच वेळी चालू असताना आम्हाला एक चांगली काउंटर ड्रोन प्रणाली असल्याचा फायदा झाला, असे जनरल चौहान यांनी सांगितले.

आधी माणूस आणि माणसात युद्ध व्हायचे. आता मशीन आणि मशीनमध्ये होत आहे. त्यासाठी टेक्नोलॉजी महत्त्वाची आहे. स्पेस, साइबर यामध्ये भविष्यात असतील. डेटा सेंट्रिक आणि रिमोट युद्ध होऊ शकते तसेच एआयचाही वापर युद्धात होऊ शकतो, असे मत त्यांनी व्यक्त केले.




**पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या ७५व्या अर्थात अमृत महोत्सवी पर्वाला दिमाखदार सुरुवात झाली आहे. यानिमित्त अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय नाट्य महोत्सव आयोजित करण्यात आला होता. सोमवारी पहिल्या दिवशी अभिनेते प्रशांत दामले यांची प्रमुख भूमिका असलेल्या 'एका लग्नाची पुढची गोष्ट' या विनोदी नाटकाला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, शकुंतला ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, भाजप जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, माजी नगरसेवक राजू सोनी, सांस्कृतिक सेलचे जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, चिन्मय समेळ, वैभव बुवा, श्याम पुंडे आदी उपस्थित होते.**





## कशेडी भुयारी मार्गांमध्ये वीजपुरवठा सुरू





**पोलादपूर : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावरील कशेडी घाटाला पर्यायी दोन्ही भुयारी मार्गावरील वीजपुरवठा आणि व्हेंटीलेशनसाठी पंखे सुरू करण्यात आले आहेत. यामुळे कोकणात प्रवास करणाऱ्यांचा प्रवास अधिक जलद, सुरक्षित आणि आरामदायी होणार आहे.

सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी कशेडी घाटाला पर्यायी भुयारी मार्गाची पाहणी करण्यासाठी पनवेल पळस्पे ते कातळी भोगावच्या भुयारी मार्गापर्यंत दौरा केला होता. त्यानंतर आता दोन्ही भुयारांतर्गत विद्युत प्रकाशझोत आणि वायूविजनासाठीचे १० एक्झॉस्ट फॅन्स सुरू झाले आहेत.

कशेडी घाटाचा पर्यायी भुयारी मार्ग हा १.८ किमी लांबीचा असून भुयारी मार्गाला जोडणाऱ्या रस्त्यांसह संपूर्ण मार्ग सुमारे नऊ किमीचा आहे. यामुळे ४५ ते ५० मिनिटांचा वळसा वाचून अवघ्या १२ ते १५ मिनिटांत रायगड जिल्ह्यामधील पोलादपूर ते रत्नागिरीतील खेडमधील कशेडीपर्यंतचा प्रवास करणे शक्य होणार आहे.

## आयपीएलमध्ये भारतीय लष्कराला मानवंदना

**अहमदाबाद :** आयपीएलचा अंतिम सामना मंगळवारी (दि. ३) रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू वि. पंजाब किंग्स यांच्यात अहमदाबादच्या



नरेंद्र मोदी स्टेडियमवर झाला. नाणेफेक होण्यापूर्वी आयपीएल क्लोजिंग सेरेमनी सोहळा झाला, ज्याची बीसीसीआयने अनोखी रूपरेषा आखली होती. यामध्ये ऑपरेशन सिंदूर या भारतीय लष्कराच्या यशस्वी मोहिमेला मानवंदना देण्यात आली.

गायक शंकर महादेवन, त्यांचे पुत्र शिवम, सिद्धार्थ यांनी देशभक्तीपर गाणी सादर केली. या दरम्यान चार हेलिकॉप्टर उडताना दिसले. सर्वात पुढे भारतीय ध्वज, त्यानंतर मागे तीन हेलिकॉप्टर तिन्ही दलांचे ध्वज घेऊन जात होते. मग फायटर प्लेनच्या मदतीने आकाशात भारतीय ध्वज तयार केला गेला. या वेळी संपूर्ण स्टेडियम 'भारत माता की जय'ने दुमदुमून गेले.

## एसटी कर्मचाऱ्यांना जूनपासून ५३ टक्के महागाई भत्ता

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांना मूळ वेतनावर जून २०२५पासून ४६ टक्केऐवजी ५३ टक्के महागाई भत्ता अदा करण्यात येईल, अशी घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. महामंडळातील कर्मचाऱ्यांना महात्मा फुले जनआरोग्य योजना किंवा धर्मवीर आनंद दिघे वैद्यकीय प्रतिपूर्ती योजना यापैकी एक निवडण्याचा पर्याय, एक कोटी रुपयांचे अपघाती विमा कवच लागू करण्याचा तसेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना मोफत प्रवास पास नऊऐवजी १२ महिन्यांसाठी देण्याचा निर्णयही उपमुख्यमंत्र्यांनी जाहीर केला.

सह्याद्री अतिथीगृह येथे एसटी महामंडळाच्या विविध संघटनांच्या प्रतिनिधींची बैठक झाली. या वेळी उपमुख्यमंत्री शिंदे बोलत होते. परिवहनमंत्री प्रताप सरनाईक, आमदार सदाभाऊ खोत, माजी खासदार आनंदराव अडसुळ, कॅप्टन अभिजित



अडसूळ, परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, महामंडळाचे उपाध्यक्ष माधव कुसेकर यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, सामान्यांसाठी जीवनवाहिनी असलेल्या एसटीच्या बससेवेच्या माध्यमातून लोकांना अपेक्षित अशी चांगली सेवा मिळाली पाहिजे. बसगाड्यांसोबतच बसस्थानकेदेखील स्वच्छ असली पाहिजे. स्वच्छतागृह, विश्राम कक्ष यांच्या स्वच्छतेसाठी प्राधान्य द्यावे. एसटीच्या माध्यमातून कार्गोसेवा सुरू करण्यावर भर देण्याचे आवाहन उपमुख्यमंत्र्यांनी केले. बसस्थानके ही बस पोर्ट झाली पाहिजेत असे सांगत एसटी अधिक फायद्यात राहण्यासंदर्भात अभ्यास करा. एसटीकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला पाहिजे यासाठी प्रयत्न करण्याचे त्यांनी सूचित केले.

या वेळी संघटनांच्या प्रतिनिधींनी विविध मागण्या केल्या. एसटीची उत्पन्न वाढ, इंधन बचत यावरही चर्चा झाली. महामंडळातील कर्मचाऱ्यांना मूळ वेतनावर ४६ टक्के महागाई भत्ता अदा करण्यात येत आहे. जून २०२५च्या वेतनापासून मूळ वेतनावर ५३ टक्के महागाई भत्ता अदा करण्यात येणार आहे. महागाई भत्त्याच्या थकबाकीबाबत निधीची उपलब्धता पाहून निर्णय घेण्यात येईल, असे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

दरम्यान, एसटीच्या सेवेतून निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना व त्यांच्या पत्नीला वर्षभर एसटीतून मोफत प्रवासाचा पास देण्याची घोषणा उपमुख्यमंत्र्यांनी केली.

# आपत्ती व्यवस्थापनासंदर्भात यंत्रणांनी सतर्क राहावे

## पनवेल मनपा आयुक्त चितळेंचे आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पावसाळी कालावधीत आपत्ती व्यवस्थापन संदर्भात सर्व संबंधित यंत्रणांनी अधिक सहकार्याने व समन्वयाने काम पाहावे. त्यामुळे नागरिकांना त्रास होणार नाही. याची गांभीर्यपूर्वक नोंद घ्यावी, असे निर्देश मनपा आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी मंगळवारी (दि.३) येथे दिले आपत्ती निवारण संदर्भात आयोजित बैठकीत ते बोलत होते.

या वेळी परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, सहाय्यक संचालक नगररचना अधिकारी केशव शिंदे, उपायुक्त सर्वश्री डॉ. वैभव विधाते, प्रसेनजित कारलेकर, मंगला माळवे, स्वरूप खारगे, अभिजीत पराडकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे, शहर अभियंता संजय कटेकर, उपअभियंता विलास चव्हाण, सहाय्यक आयुक्त सर्वश्री श्रीराम पवार, सुबोध ठाणेकर, चारही विभागचे विभाग प्रमुख, पालिका अधिकारी, सिडको अधिकारी, आयआरबी प्रतिनिधी उपस्थित होते.



सी १ प्रकारातील इमारती रिकाम्या करण्याबाबत पोलीस विभागाने सहकार्य करावे तसेच सिडको नोडमधील धोकादायक इमारतीमधील वीज पुरवठा खंडित करण्याबाबत, गटारी मधील वीज केबल काढून घेण्याबाबत वीज वितरण विभागाने सहकार्य करण्याबाबत आयुक्तांनी वीज वितरण विभागास सुचित केले. त्याचप्रमाणे गाढी नदीतील भरावामुळे पूर येण्याची संभावना असल्याकारणाने लवकरात लवकर नदीमधील भराव काढण्याबाबत सिडको प्राधिकरणास सूचित केले.

यासोबतच मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात झालेल्या जोरदार पाऊसावेळी पांडवकडा भागात अनधिकृतरित्या तरूणांनी जाऊ नये यासाठी सिडको विभाग व पोलीस बंदोबस्त करण्याबाबत कार्यवाही करावी, असे पोलीस विभागास सांगितले.

पावसाळ्यात अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवरती कळंबोलीमधील एसटीपी प्लॅन्टमध्ये अधिकचे पंप सुरू ठेवावेत, त्यांची दुरुस्ती करून ठेवण्याबाबत संबंधितांना सूचित केले. याचबरोबर बस स्टॅन्डमधील होर्डिंगचे स्ट्रक्चरल ऑडीट करून घ्यावे. काही दुर्घटना होणार नाही याबाबत दक्ष रहावे व काळजी घ्यावी. अशा सूचना एसटी महामंडळाच्या अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. तसेच बस स्टॅन्ड परिसरातील खड्डे भरण्याबाबत, हायवेवरील रस्त्यावर पडणारे पाण्याची योग्य प्रकारे विल्हेवाट लावण्याबाबत व रस्त्यांवरील खड्डे भरण्याबाबत या बैठकीत चर्चा झाली.

पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या जिल्हा परिषदेच्या शाळा नादुरूस्त शाळा पावसाळयापूर्वी दुरूस्त करून घेणे व ज्या शाळांच्या इमारती धोकादायक आहे त्या इमारती बांधकाम विभागास पाडण्याच्या सूचना दिल्या. साथरोगासारखे विकार उद्भवल्यास तयारीच्या दृष्टीने औषधसाठा व इतर वैद्यकिय सेवासुविधांची पुर्तता करण्याबाबत वैद्यकिय आरोग्य विभागास आयुक्तांनी सांगितले.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त हेल्मेट वाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रामशेठ ठाकूर यांनी आपल्या ७५ वर्षाच्या कारकिर्दीत समाजासाठी उपयुक्त असलेली अनेक कामे यशस्वी केली. यामध्ये त्यांना आपल्यासारख्या अनेक समाजबांधवांची साथ लाभली, असे गौरवोद्‌गार आमदार प्रशांत ठाकूर खारघरमध्ये लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून आयोजित केलेल्या हेल्मेट वाटप कार्यक्रमावेळी काढले.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांना ७४वर्षे पूर्ण झाली असून त्यांनी अमृत महोत्सावी वर्षात पदार्पण केले आहे. त्यानिमित्त संपुर्ण वर्षभरात अनेक सेवाभावी उपक्रम राबवले जाणार आहेत. त्यानुसार महाराष्ट्र आम्ही एकत्र श्रमिक संघटना, महाराष्ट्र प्रदेश वाहतूक संघटना आणि प्रादेशिक



परिवहन कार्यालयाच्या वतीने खारघर सेक्टर ३६मधील व्हॉली शिल्प येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयात रस्ता सुरक्षेविषयी जनजागृती करण्यासाठी हेल्मेटचे वाटप करण्यात आले. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते हेल्मेटचे वाटप करण्यात आले.

या वेळी जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, चिटणीस ब्रिजेश पटेल, माजी नगरसेवक नरेश ठाकूर, तळोजा मंडळ अध्यक्ष दिनेश खानावकर, विजय भोईर, महाराष्ट्र वाहतुक संघटनेचे अध्यक्ष प्रभूदास भोईर, शंकुनाथ भोईर, सुजित भगत, सरस्वती काथारा, सचिन किस्मतराव, विशाल घरत, संतोष आचार्य, सुदाम ठाकूर, उप प्रादेशीक परिवहन अधिकारी जयंत चव्हाण, सहाय्यक प्रादेशीक परिवहन अधिकारी निलेश घोटे आदी उपस्थित होते.

दरम्यान, खारघरनंतर कळंबोली आणि पनवेलमध्येही हा उपक्रम राबविण्यात येणार असून तब्बल एक हजार हेल्मेटचे वाटप करण्याचे नियोजन आहे.

# सैनिक स्कूल परीक्षेत खारघरच्या क्षितिज जाधवचा प्रथम क्रमांक

## नेत्रा किरण पाटील यांच्याकडून कौतुक

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर शहरातील क्षितिज कल्याण जाधव हा भारतातील प्रतिष्ठेच्या असलेल्या सैनिक स्कूल परीक्षा (AISSEE)मध्ये महाराष्ट्रात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाल्याबद्दल नगरसेविका नेत्रा किरण पाटील यांनी अभिनंदन केले.

खारघर शहरातील प्रभाग क्रमांक चारमधील रहिवासी श्री कल्याण जाधव यांचा चिरंजीव क्षितिज कल्याण जाधव (रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचा विद्यार्थी) याने भारतातील प्रतिष्ठेच्या असलेल्या सैनिक स्कूल परीक्षा २०२५ मध्ये ३०० पैकी २९६



एवढे गुण प्राप्त करून महाराष्ट्र राज्यात पहिला क्रमांक व संपूर्ण भारतात बाराव्या क्रमांकाचे स्थान मिळवीत यश प्राप्त केले. त्याबद्दल स्थानिक नगरसेविका नेत्रा किरण पाटील तसेच युवाप्रेरणा सामाजिक संस्थेचे अध्यक्ष व भाजप खारघर मंडल उपाध्यक्ष किरण पाटील यांनी क्षितिजच्या निवासस्थानी जाऊन त्याचे अभिनंदन केले क्षितिजला एक भेटवस्तू व शाल देऊन त्याचा सत्कार करण्यात आला.

क्षितिजच्या या यशात त्याच्या आई वडिलांचादेखील तेवढाच महत्त्वाचा वाटा आहे. क्षितिजिला स्वतःलादेखील अभ्यासाची खूप आवड असल्याचे त्याच्या बोलण्यातून लक्षात आले. क्षितिजला त्याच्या यशाबद्दल विचारले असता त्यांनी अभ्यासाबरोबरच खेळही तेवढाच महत्त्वाचे असल्याचे सांगितले.

# भाजप कार्यालयात गोपीनाथ मुंडे यांची पुण्यतिथी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

बहुजनांचे आधार माजी केंद्रीय मंत्री स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त आमदार प्रशांत दादा ठाकूर यांच्या उपस्थितीत भारतीय जनता पक्ष जनसंपर्क कार्यालय खांदा कॉलनी येथे मंगळवारी (दि.३) सकाळी ११:३० वाजता त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्याचा कार्यक्रम झाला.



या वेळी भाजप जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, नवीन पनवेल शहर मंडळ अध्यक्ष दशरथ म्हात्रे, माजी उपमहापौर सीता पाटल, प्रभाग क्रमांक १५ अध्यक्ष शांताराम महाडिक, प्रभाग क्रमांक १६ अध्यक्ष शिवाजी भगत, भीमराव पोवार, गणेश पाटील, गोपीनाथ मुंडे, किशोर चौतमोल, मोतीराम कोळी, संजय कांबळे, सचिन गायकवाड, आशा मुंडे, दीपक जांभळे, प्रवीण भोसले, युवराज बेडसे, अंकुश खरमाटे, पुंडलिक म्हात्रे, विद्या यादव, सीमा निकम, हरिदास वनवे, नवनाथ पवळे, अक्षय सिंग, श्री. भद्रशेट्टी आदी उपस्थित होते.

# गरीब, गरजू विद्यार्थिनीला आर्थिक मदत

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त सय्यद अकबर यांचा उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या जन्मदिनाच्या निमित्ताने गरीब गरजू विद्यार्थिनीला अभियांत्रिकी शिक्षणासाठी भरघोस आर्थिक सहाय्य करण्याचा अभिनव उपक्रम भाजप अल्पसंख्यांक मोर्चाचे महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष तथा क्रियाशील प्रेस क्लबचे अध्यक्ष सय्यद अकबर यांनी राबविला आहे. अनोख्या पद्धतीने लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर साहेब यांचे अभिष्टचिंतन केल्याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

याबाबत प्रतिक्रिया देताना सय्यद अकबर म्हणाले की, लोकनेते रामशेठ ठाकूर त्यांच्यासारख्या धोरणी आणि



अभ्यासू नेतृत्वामुळेच प्रकल्पग्रस्त बांधव ऐश्वर्यसंपन्न जीवन जगत आहेत. आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो आणि म्हणूनच आपल्या उत्पन्नातील काही भाग समाजासाठी दान केला पाहिजे ही शिकवण त्यांनी माझ्यासारख्या कार्यकर्त्याला दिली आहे. म्हणूनच त्यांच्या जन्मदिनाच्या औचित्याने काळसेकर अभियांत्रिकी महाविद्यालयात शिकत असलेल्या अलिशा शेख या गरीब व गरजू विद्यार्थिनीला मी २५ हजार रुपयांची आर्थिक मदत केली आहे. अभियांत्रिकी अभ्यासक्रमाचे पहिल्या वर्षात शिकणाऱ्या या विद्यार्थिनीला मदत करून लोकनेते रामशेठ ठाकूर साहेबांचे अभिष्टचिंतन करण्याचा प्रयत्न मी यावर्षी केला आहे.

लोकनते रामशेठ ठाकूर साहेबांच्या प्रत्येक जन्मदिनी मी गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य करण्याचे आश्वासन देतो. या वेळी सय्यद अकबर यांच्या समवेत उद्योजक सुधीर सुर्वे व पत्रकार साबीर शेख यांची प्रमुख उपस्थिती होती.

# आरोग्य शिबिरात तुळशीच्या रोपांचे वाटप

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रामशेठ ठाकूर साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त मोफत आरोग्य शिबिर तसेच त्यांचा ७४वा वाढदिवस असल्यामुळे ७४ तुळशीची रोपटे शिबिरासाठी आलेल्या नागरिकांना वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन पनवेल महापालिकेचे माजी स्थायी समिती सभापती ॲड. नरेश गणपत ठाकूर यांनी केले होते.

या कार्यक्रमाला सीनियर सिटीजन वेल्फेअर असोसिएशन सेक्टर १० अध्यक्ष तसेच पदाधिकारी, भारतीय जनता पक्ष खारघर शहर मंड चे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. तसेच युनिक्युअर इंडिया फाउंडेशनचे डॉक्टर यांचे सहकार्य लाभले.




# भारत विकास परिषदेतर्फे महिला सक्षमीकरण उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारत विकास परिषद, पनवेल शाखेच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्मत्रिशताब्दीचे औचित्य साधून 'महिला सक्षमीकरण' या उपक्रमाचा प्रारंभ करण्यात आला.

या अंतर्गत महिलाना शिलाई यंत्राचे वितरण करण्यात आले. तसेच या निमित्त मला उमजलेल्या अहिल्यादेवी होळकर या विषयावर ऑनलाईन निबंधस्पर्धा आणि पोस्टर मेकिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. त्याला राज्यभरातील स्पर्धकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या स्पर्धांमधील विजेत्यांचा पारितोषिक वितरण सोहळा नवीन पनवेल येथील डॉ. कीर्ती समुद्र यांच्या क्लिनिकमधील हॉलमध्ये झाला. निबंध स्पर्धेचे परीक्षण सुलभा निंबाळकर व मानसी वैशंपायन आणि पोस्टर मेकिंग स्पर्धेचे परिक्षण संदिप मोरे व माधव अभ्यंकर यांनी केले. डॉ.शिल्पा गोडबोले, डॉ.समिधा गांधी, जयंती हळदीपूरकर व डॉ. कीर्ती समुद्र, ज्योती कोम्बतुर यांनी या कार्यक्रमासाठी मोलाचे योगदान दिले.

निबंध स्पर्धेमधे डॉ.संगिता जोशी, पनवेल यांनी प्रथम, श्रद्धा वझे कल्याण, यानी द्वितीय, धनश्री केसकर नाशिक यांनी तृतीय क्रमांक प्राप्त केला. यवतमाळ येथील ज्योती निचत आणि शालेय गटात पनवेल येथील ऐश्वर्या पाटील व प्रतीक पाटील यांना उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले. ई-पोस्टर स्पर्धेमधे निलीमा देशपांडे यांनी प्रथम व त्विशा काडियन यांनी उत्तेजनार्थ पारितोषक प्राप्त केले. हस्तरेखित पोस्टर स्पर्धेत त्रिशा पालव यांनी प्रथम व अमेया पाटील यांनी उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त केले.



# झाडे लावण्याबरोबरच ती जोपासण्याचीही जबाबादारी घ्यावी -भाजप नेते अरुणशेठ भगत

## खारघरमध्ये वृक्षारोपण कार्यक्रम

**खारघर : रामप्रहर वृत्त**

झाडे लावण्याबरोबरच ती जोपासण्याची ही जबाबादारी घ्यावी, असे प्रतिपादन भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत यांनी खारघरमध्ये वृक्षारोपणाच्या कार्यक्रमावेळी केले.

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आपल्या अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण केले आहे. त्यामुळे पुढील वर्षभरात अनके सामाजिक उपक्रम राबवण्यात येणार आहेत. त्या पार्श्वभूमीवर प्रवीण स्पोर्ट्स ॲण्ड वेल्फेअर असोसिएशन आणि श्री सिद्धीविनायक उत्सव मित्र मंडळ सेक्टर १२ यांच्या वतीने १००० वृक्ष रोपण करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. त्यानुसार खारघर सेक्टर ६ येथील ड्रायव्हींग रेंजमध्ये भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी आणि भाजपचे ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत यांच्यासह इतर मान्यवरांच्या हस्ते मंगळवारी (दि.३) वृक्षारोपण करण्यात आले.





या कार्यक्रमास भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत यांच्यासह भाजपचे जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, प्रल्हाद केणी, खारघर मंडळ अध्यक्ष प्रवीण पाटील, तळोजा मंडळ अध्यक्ष दिनेश खानावकर, माजी नगरसेवक नरेश ठाकूर, शहर सरचिटणीस दीपक शिंदे, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, अमर उपाध्याय, बिना गोगरी, मन्सूर पटेल, हनुमंत पवार, संजय घरत, अशोक अच्छन, एस.के. डोळस, सुशिला शर्मा, लोकेश कोरडीया, शोभा मिश्रा, प्रिया दळवी, नवीन जैन, आयोजक युवा नेते शुभ पाटील, भूषण पाटील, फुलाजी ठाकूर, गुरूनाथ ठाकूर, सरस्वती काथारा, वैभव आडे, नंददीप घाग, निखील राव, रोहित तिवारी, विजय वंजारे, सर्वेश ठाकूर आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## संपादकीय

# करोना गेलेला नाही

देशातील काही राज्यांमध्ये करोनाचे रुग्ण वाढू लागल्याने पुन्हा एकदा त्याविषयी काहिसे चिंतेचे वातावरण आहे. सध्या जगभरात भारत, चीन आणि इतर अनेक देशांमध्ये पुन्हा एकदा कोविड-१९च्या रुग्णांमध्ये वाढ होताना दिसते आहे. जागतिक आरोग्य संघटनेने परिस्थितीकडे सातत्यपूर्ण लक्ष ठेवणे आवश्यक असल्याचे म्हटले आहे.

**साधारण फेब्रुवारीच्या मध्यापासून जगभरात पुन्हा एकदा कोविडचे विषाणू सक्रिय होताना दिसू लागल्याचे जागतिक आरोग्य संघटनेने अलीकडेच म्हटले आहे. संख्यावाढीसोबतच कोविड विषाणूचे दोन नवे सबव्हेरिएंटही दिसले असून सध्या या नव्या स्वरूपातील विषाणूंचे निरीक्षण सुरू आहे. अर्थात त्यापासून धोका असल्याचे आरोग्य संघटनेने अद्याप तरी जाहीर केलेले नाही. भारतातील करोना रुग्णांची संख्या तूर्तास चार हजारांच्या वर पोहोचली आहे. महाराष्ट्र, दिल्ली आणि केरळमध्ये रुग्णसंख्या वाढल्याचे ठळकपणे दिसते. मंगळवारी सकाळी उपलब्ध आकडेवारीनुसार देशात करोनाचे सध्या ४०२६ सक्रिय रुग्ण आहेत. यापैकी ६५ केसेस गेल्या चोविस तासांत नोंदल्या गेल्या असून याच काळात ५ मृत्यूंचीही नोंद झाली. दगावलेले रुग्ण केरळ, महाराष्ट्र, तमिळनाडू आणि पश्चिम बंगाल या राज्यांमधील आहेत. दिल्लीतही करोनाबाधितांची संख्या वाढू लागली आहे. केंद्रीय आरोग्य मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार दिल्लीत ४८३ करोनाबाधित आहेत. करोना महासाथीच्या निर्मूलनाच्या बाबतीत त्वरित पावले उचलली जातील आणि प्रोटोकॉल व आरोग्य दिशानिर्देश लागू केले जातील अशी आशा आहे असे म्हणतानाच दिल्ली उच्च न्यायालयाने सोमवारी केंद्र सरकारकडून स्वॅब नमुना संकलनाची तयारी, आरोग्य केंद्रे आणि वाहतूक धोरण याबद्दल सविस्तर माहिती मागितली आहे. महाराष्ट्रात सोमवारी ५९ नव्या केसेस नोंदल्या गेल्या. यापैकी २० मुंबईतील आहेत. पश्चिम बंगालमध्ये ही संख्या ४१ इतकी दिसते. महाराष्ट्रातील सक्रिय रुग्णांची संख्या या घडीला ४९४ आहे. रुग्णांमधील लक्षणे सर्दी किंवा फ्लूसारखीच असून सोबत ताप, कफ, घसा धरणे, नाक वाहणे, डोकेदुखी, थकवा, अंगदुखी व भूक न लागणे अशीही लक्षणे दिसतात. मुंबईत मे महिन्यापासून कोविड रुग्णांची संख्या वाढू लागली आहे. शहरात आतापर्यंत कोविडच्या ४८३ केसेस नोंदल्या गेल्या असून त्यापैकी ४७७ या मे महिन्यातल्या आहेत. पुणे शहर, छत्रपती संभाजीनगर आणि ठाणे शहरातही केसेस नोंदल्या गेल्या आहेत. पिंपरी-चिंचवड, सातारा, कोल्हापूर, अकोला, सांगली आणि पुणे ग्रामीण येथे तुलनेने कमी संख्येने रुग्ण आढळले आहेत. जानेवारीपासून महाराष्ट्रात जवळपास १२ हजार रुग्णांची कोविड तपासणी पार पडली आहे. यातले सुमारे ४९४ रुग्ण आता सक्रिय असून ३६९ रुग्ण बरे झाले आहेत. कर्नाटकात सोमवारपासून शाळा सुरू झाल्या. तेथील वाढत्या करोनासाथीमुळे तेथे विद्यार्थ्यांसाठी मास्क वापरणे सक्तीचे करण्यात आले आहे. शिक्षक आणि पालकांसाठीही नियमांची अंमलबजावणी सक्तीची आहे. कर्नाटकात सोमवारी ८७ करोना केसेसची नोंद झाली. त्या राज्यात सध्या ३११ सक्रिय केसेस आहेत. जगभरात गेल्या वर्षीही याच सुमारास अशी वाढ दिसली होती. परंतु 'सीझनल' म्हणावे असा काही पॅटर्न या वाढीत अद्याप तरी दिसलेला नाही असे जागतिक आरोग्य संघटनेचे म्हणणे आहे. कोविड महासाथीच्या भीषण आठवणी मागे टाकून जवळपास अवघे जगच त्यातून महत्प्रयासाने सावरले आहे. आता कोविड पुन्हा काहिसा डोके वर काढताना दिसतो आहे. चिंता करण्यासारखी परिस्थिती नसली तरी खबरदारी घेणे केव्हाही हिताचेच.**

# अभिनेते पद्मश्री अशोक सराफ



मराठी सिनेसृष्टीतील दिग्गज अभिनेते आणि हास्यसम्राट अभिनेते अशोक सराफ यांचा पद्मश्री पुरस्काराने गौरव करण्यात आलं ही खरोखरच सर्वांसाठी अभिमानाची गोष्ट ठरली आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते अशोक सराफ यांना पद्मश्री पुरस्कार प्रदान करण्यात आला. हे चित्र पाहून नक्कीच सर्वच चाहत्यांनी आनंद व्यक्त केला आहे.

पुरस्कार स्वीकारल्यानंतर अशोक सराफ यांनी देखील सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत आभार मानले आहेत. पोस्टमध्ये ते म्हणाले की पद्मश्री हा सन्मान माझ्या जीवनातील एक विशेष क्षण आहे. मी महाराष्ट्र शासनाचे आभार मानतो. माझ्या कुटुंबीयांचे, सहकलाकारांचे आणि प्रेक्षकांचेही आभार. तुमच्या प्रेमाशिवाय हे शक्य झालं नसतं. तुमचा प्रेम आणि आशिर्वाद कायम असाच राहू द्या, असं म्हणत त्यांनी आनंद व्यक्त केला आहे

चार दशकं आपल्या अभिनयाने प्रेक्षकांना खदखदून हसवणारे तर कधी चटकन डोळ्यात पाणी आणणारे मराठी सिनेसृष्टीतील चतुरस्त्र अभिनेते अशोक सराफ यांना सर्वजण प्रेमाने 'मामा'अशी हाक मारतात. १९६९ पासून ते सिनेसृष्टीत कार्यरत आहेत. मराठीसोबतच त्यांनी अनेक हिंदी सिनेमांमध्येही काम केलं. 'जानकी' या सिनेमातून त्यांनी अभिनयात पदार्पण केलं. यानंतर त्यांनी कधीही मागे वळून पाहिलं नाही अशोक सराफ यांनी चित्रपट करिअरमध्ये जवळपास अडीचेशेहून अधिक चित्रपटांमध्ये काम केले. अगदी विनोदी भूमिकांपासून ते खलनायकी भूमिका त्यांनी पडद्यावर साकारल्या आहेत.

हिंदी-मराठी चित्रपट, मालिका आणि मराठी रंगभूमीवरील हिरा. पडद्यावर विविधांगी भूमिका साकारणारे अशोक सराफ खासगी आयुष्यात मात्र अतिशय शांत स्वभावाचे आहे. मीडियापासूनही ते कायम लांब राहतात. त्यांच्या खासगी आयुष्याविषयी त्यांच्या चाहत्यांना फारसे काही ठाऊक नसते. संपूर्ण रसिक प्रेक्षकांनी त्यांना मामा ही उपाधीच दिली आणि मामा म्हणून घेणे अशोक सराफ यांना देखील विशेष आवडते. निवेदिता जोशी यांच्यासोबत केले लग्न

अशोक सराफ हे एक लोकप्रिय मराठी अभिनेते आहेत. मराठी चित्रपटांसोबत त्यांनी अनेक हिंदी चित्रपटांतही विविध भूमिका केल्या असून दूरचित्रवाणीच्या छोट्या पडद्यावरील 'हम पांच' सारख्या मालिकेमध्येही त्यांनी अभिनय केला. लक्ष्मीकांत बेर्डे यांच्यासोबत मराठी चित्रपटसृष्टीतील विनोदी चित्रपटांचा काळ गाजवणारे अशोक सराफ हे एक मराठी सुपरस्टार आहेत. सिने अभिनेत्री निवेदिता जोशी ह्या सराफांच्या पत्नी असून नाट्यअभिनेते रघुवीर नेवरेकर हे त्यांचे मामा होते.

विनोदाची अचूक वेळ हे त्यांचे वैशिष्ट्ये

त्यांनी अनेक चित्रपटात विनोदी भूमिका करण्याबरोबरच काही चित्रपटात खलनायकी तसेच विविध भूमिका तितक्याच ताकदीने व रसिकांच्या आयुष्यभर स्मरणात राहतील अशा साकारलेल्या आहेत. उत्कृष्ट अभिनय, सहज विनोद प्रवृत्ती, चेहऱ्यावरील कमालीचे हावभाव, विनोदाची अचूक वेळ, इत्यादी त्यांच्या अभिनयाची वैशिष्ट्ये होती. अशोक सराफ, लक्ष्मीकांत बेर्डे, सचिन पिळगांवकर, महेश कोठारे या अभिनेत्यांनी मराठी चित्रपटामध्ये फार मोठा काळ गाजवला आहे. त्यांनी मी बहुरूपी हे आत्मचरित्र लिहिले आहे.

मूळचे बेळगावचे असणाऱ्या अशोक सराफ यांचा जन्म १९४७ साली मुंबईत झाला. दक्षिण मुंबईतील चिखलवाडी या भागात त्यांचे बालपण गेले. गोपीनाथ सावकार हे त्यांचे मामा होत. अशोक सराफ यांचे शिक्षण मुंबईतील डी.जी.टी. विद्यालयात झाले. त्यांना सुरुवातीपासूनच नाटकांची अतिशय आवड होती. वयाच्या अठराव्या वर्षी त्यांनी शिरवाडकरांच्या'ययातीआणि देवयानी 'या नाटकातील विदूषकाच्या भूमिकेद्वारा व्यावसायिक रंगभूमीवर प्रवेश केला. काही संगीत नाटकांतूनदेखील त्यांनी भूमिका केल्या. दरम्यान अशोक सराफ हे बँकेत नोकरीला लागले पण त्यांचे मन काही तिथे लागले नाही. अन् त्यांनी पुन्हा सिनेसृष्टीकडे पाय वळवला.

गजानन जागीरदार यांच्या 'दोन्ही घरचा पाहुणा' या चित्रपटात त्यांनी छोटीशी भूमिका केली. त्यानंतर दादा कोंडके यांच्या 'पांडू हवालदार'मधील इरसाल पोलीस, 'राम राम गंगाराम'मधील म्हमद्या खाटीक अशा बहुढंगी भूमिका त्यांनी लीलया साकारल्या. अशोक सराफ यांचा नाटक, सिनेमा आणि दूरचित्रवाणी या त्रिस्थळी काम सुरू आहे आणि प्रत्येक माध्यमात त्यांनी अभिनयाची पारितोषिके व पुरस्कार मिळविले आहेत. चित्रपटात अखंड बडबड करणारी विनोदी पात्रे साकारणारे अशोक सराफ यांचा स्वभाव मात्र शांत व केवळ मित्र-मंडळीतच मिसळणारा आहे.

अशोक सराफ यांनी केवळ विनोदीच नव्हे तर गंभीर स्वरूपापासून ते खलनायकी प्रवृत्तीपर्यंत विविध छटांचे दर्शन त्यांनी आपल्या नाट्य-चित्रसृष्टीतील कामाद्वारे घडविले आहे. दादा कोंडकें बरोबर पांडू हवालदार , तुमचं आमचं जमलं , राम राम गंगाराम यासारख्या चित्रपटातून त्यांनी प्रेक्षकांपुढे अभिनयाचे वेगळेच पैलू उलगडले. वजीर सारख्या चित्रपटातून राजकारणी व्यक्तिरेखा त्यांनी साकारली तर चौकट राजामधील सहृदय गुणाच्या व्यक्तिरेखा केली. ऐंशीच्या दशकात लक्ष्मीकांत बेर्डे यांच्यासमवेत त्यांची जोडी प्रचंड गाजली

आणि या जोडगोळीने अशी ही बनवाबनवी, धूमधडाका, यासारख्या चित्रपटांमार्फत धमाल उडवून दिली. अशोक सराफ यांच्या बहुरंगी अभिनयाला सचिन पिळगांवकर, महेश कोठारे यांसारख्या कसलेल्या दिग्दर्शकांची साथ मिळून नवरी मिळे नवऱ्याला, आत्मविश्वास, गंमत जंमत, आयत्या घरात घरोबापासून अलीकडच्या शुभमंगल सावधान, आई नंबर वन' व 'पहिली शेर दुसरी सव्वाशेर नवरा पावशेर'पर्यंत असंख्य चित्रपटांनी मराठी रसिकांना खिळवून ठेवले.

'अनधिकृत' या त्यांच्या रंगभूमीवरील पुनरारंभाच्या नाटकास योग्य प्रतिसाद मिळाला नाही. 'मनोमिलन'नंतर सध्या अशोक सराफ सारखं छातीत दुखतंय! हे विनोदी नाटक करीत आहेत. त्यांच्या सोबत पत्नी निवेदिता जोशी-सराफ ह्या सहकलाकार आहेत. पत्नी निवेदिता जोशी-सराफ ह्यांच्या सोबत त्यांनी एक निर्मिती संस्था स्थापन करून 'टन टना टन' ही मराठी व काही हिंदी मालिका बनवल्या. हम पांच या झी वाहिनीवरील हिंदी मालिकेने त्यांना विशेष लोकप्रियता मिळवून दिली. हिंदी चित्रपटसृष्टीत त्यांनी 'दामाद' (जावई) या चित्रपटाद्वारे पाऊल ठेवले. 'करण अर्जुन', 'कोयला', 'येस बॉस', 'जोडी नं.१' हे अशोक सराफ अभिनीत काही उल्लेखनीय चित्रपट आहेत. त्यांना पद्मश्रीने गौरवण्यात आलं त्यावेळीपुरस्कार स्वीकारण्याआधी अशोक सराफ यांच्या एका कृतीने सर्वांची मनं जिंकून घेतली आहेत. पुरस्कार स्वीकारण्याआधी अशोक सराफ पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि सभागृहातील उपस्थितांचे हात जोडून अभिवादन केले. त्यांच्या या कृतीने सगळ्यांची मनं जिंकून घेतली आहेत. जेव्हा त्यांच्या हातात तो पुरस्कार देण्यात आला तेव्हा उपस्थित असलेल्यांच्या सर्वांच्या चेहऱ्यावर एक आंनदित हास्य होत. सर्वांनी मनापासून त्यांचे अभिनंदन केल्याचं दिसून आलं.

(साभार : इंटरनेट)



## बदलते तंत्रज्ञान

### आयफोन १७ सीरिज कधी होणार लाँच?

ॲपल सप्टेंबर २०२५ मध्ये आयफोन १७ लाँच करू शकतात. या सीरीजमध्ये आयफोन १७, आयफोन १७ एअर, आयफोन १७ प्रो आणि आयफोन १७ प्रो मॅक्स यांचा समावेश असण्याची अपेक्षा आहे.नवीन आयफोन १७ च्या सीरीजमध्ये स्लिम बॉडी डिझाइन, अपग्रेडेड डिस्प्ले तंत्रज्ञान आणि पुन्हा डिझाइन केलेल्या कॅमेरा सेटअपसह उपलब्ध करून दिलं जाऊ शकतं.पुढील आयफोन सीरीज सप्टेंबरच्या मध्यात लाँच होण्याची अपेक्षा आहे.अधिकृत लाँच झाल्यानंतर आयफोन्सच्या प्री-ऑर्डर सुरू होण्याची अपेक्षा आहे. स्मार्टफोनची विक्री लाँच झाल्यानंतर एक किंवा दोन आठवड्यांनी सुरू होते. फेब्रुवारीमध्ये, आयफोन १७ सीरीज दाखवण्याचा दावा करणारे C-D-आधारित रेंडर ऑनलाइन लीक झाले. यात, आयफोन १७ एअर, आयफोन १७, आयफोन १७ प्रो आणि आयफोन १७ प्रो मॅक्सचे डिझाइन समोर आले होते.



नवीन कॅमेरा असू शकतो-आयफोन १७ एअर आणि आयफोन १७ प्रो मध्ये पुन्हा डिझाइन केलेला नवीन कॅमेरा असू शकतो. आयफोन १७ मध्ये सध्याच्या आयफोन १६ प्रमाणेच कॅमेरा लेआउट असण्याची अपेक्षा आहे. त्याच वेळी, आयफोन १७ एअरमध्ये सिंगल रियर कॅमेरा दिला जाऊ शकतो. तर आयफोन १७ प्रो मॅक्स मॉडेल्समध्ये मोठा कॅमेरा मॉड्यूल असू शकतो, जो ट्रिपल लेन्स सेटअपसह येईल आणि लेन्स, LiD-R सेन्सर आणि फ्लॅशमध्ये जास्त जागा असेल.

२०२५ मध्ये रिलीज झालेल्या सर्व आयफोन मॉडेल्समध्ये पुन्हा डिझाइन केलेला २४-मेगापिक्सेलचा फ्रंट कॅमेरा असण्याची अपेक्षा आहे. सध्याच्या आयफोन १६ सिरीजमध्ये १२ मेगापिक्सेल रिझोल्यूशनसह सेल्फी कॅमेरा आहे.याशिवाय, ॲपल सध्याच्या आयफोन्स व्यतिरिक्त येणाऱ्या नवीन आयफोन्समध्ये ४८ मेगापिक्सेल टेलिफोटो लेन्स देऊ शकते. या बदलासह, आयफोन १७ प्रो व्हेरिएंट हा या सीरीजमधला पहिला फोन असेल जो ४८-मेगापिक्सेलचा रियर कॅमेरासह येईल. तसेच मागील मॉडेल्सप्रमाणे, फोनमध्ये वाइड आणि अल्ट्रा-वाइड लेन्स उपलब्ध असतील.

**नवीन आयफोनमध्ये रॅमदेखील वाढू शकते**

आयफोन १७ आणि आयफोन १७ एअर हे ॲपलच्या आगामी -१९ प्रोसेसरसह सादर केले जाऊ शकतात. त्याच वेळी, प्रो व्हेरिएंटमध्ये अधिक प्रगत -१९ प्रो चिपसेट असण्याची अपेक्षा आहे.

# 'मिस इंडिया' अभिनेत्री नूतन



**निमित्त**

बॉलीवूडच्या सदाबहार अभिनेत्रींमध्ये नूतन या नावाचा समावेश आहे. तिच्या अभिनयाची जादू काहीऔरचं होती. ब्लॅक अँड व्हाईटच्या जमान्यात नूतन एक रंगबेरंगी रत्न होती.रुपेरी पडद्यावर आपल्या अभिनयाच्या विविधांगी छटा कशा उमटवायच्या हे तिला अगदी व्यवस्थित माहित होतं.जिथे महिला घरातून बाहेरदेखील पडत नव्हत्या. अशा काळात तिने मिस इंडियाचा किताब जिंकला, अभिनेत्री होऊन स्वीमसूट परिधान करून सिनेइंडस्ट्री गाजवली. दमदार कारकीर्द आणि सुखी वैवाहिक जीवन असूनदेखील तिच्या आयुष्याचा अंतिम टप्पा वेदनादायी ठरला.

नूतनचा जन्म ४ जून १९३६ रोजी मुंबईत झाला. तिचे वडील प्रसिद्ध सिनेनिर्माता, मराठी कवी आणि आई अभिनेत्री म्हणून कार्यरत होती. पण इंडस्ट्रीत तिला चांगला ब्रेक मिळाला नाही. अखेर लेकीनेच आईला सिनेमांत लाँच केले. वयाच्या १४ व्या वर्षी तिने १९५० मध्ये प्रदर्शित झालेल्या 'हमारी बेटी' सिनेमातून फिल्म डेब्यू केला. पुढे वयाच्या १६ व्या वर्षी १९५२ मध्ये तिने 'मिस इंडिया'चा ताज जिंकला. तिचे यश बऱ्याच लोकांना बघवत नव्हे. कित्येकांनी कुरूप म्हणत तिची टिंगल केली. पण चेष्टा हेच आपले कौतुक म्हणत नूतनने काम सुरू ठेवले. काही सिनेमात काम केल्यानंतर ती लंडनला गेली आणि परतल्यानंतर तिने 'सीमा' सिनेमात काम केले. ज्यासाठी तिला फिल्मफेअरचा 'सर्वोत्कृष्ट अभिनेत्री' हा पुरस्कार मिळाला. पुढे 'पेइंग गेस्ट', 'बंदिनी', 'अनारी', 'सुजाता कर्मा'सारख्या सिनेमात ती झळकली.

'मिस इंडिया'चा 'किताब पटकावणारी आणि स्वीमसूट घालून सिनेमात काम करणारी नूतन पहिलीच बॉलिवूड अभिनेत्री होती. तिला वयाच्या १४ व्या वर्षी 'मुघल-ए-आझम' सिनेमात अनारकलीच्या भूमिकेची ऑफर आलेली. पण तिने या भूमिकेसाठी नकार दिला होता.

संजीव कुमार यांचे नूतनवर प्रेम होते याविषयी सगळेच जाणतात. पण राजेंद्र कुमार आणि शम्मी कपूर यांचाही नूतनवर जीव जडला होता. राजेंद्र कुमार यांनी नूतनच्या आईकडे तिचा हात मागितला होता. पण त्यांनी हे नाते नाकारले. शम्मी कपूरसुद्धा नूतनच्या प्रेमात होते. विशेष म्हणजे ते एकमेकांना लहानपणापासून ओळखत होते. नूतनच्या आईला या नात्याबाबत अडचण नव्हती. मात्र, तरीही हे लग्न होऊ शकलं नाही. पुढे जाऊन वयाच्या २३ व्या वर्षी लेफ्टनंट कमांडर रजनीश बहल यांच्याशी तिचा विवाह झाला. तिने लग्नानंतर सिनेमा सोडायचा ठरवलं होतं. त्यामुळे दिग्दर्शक बिमल रॉय यांचा 'बंदिनी' सिनेमा तिने नाकारला. पण रजनीश यांनी तिला सिनेमात काम करण्यासाठी प्रोत्साहित केलं आणि पुढे तिची कारकीर्द सुरू राहिली.

अभिनेत्री नूतनला १९९० मध्ये ब्रेस्ट कॅन्सरचे निदान झाले. हळूहळू तिच्या यकृतात कॅन्सर पसरला आणि त्यानंतर १९९१ मध्ये तिचे निधन झाले. शेवटच्या दिवसांत तिची प्रकृती अत्यंत खालावली होती. रुग्णालयात दाखल केल्यानंतर २१ फेब्रुवारी १९९१ रोजी तिने जगाचा निरोप घेतला. आयुष्याच्या अंतिम टप्प्यात अभिनेत्रीने अत्यंत वेदना सहन केल्या. (साभार : इंटरनेट)

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

### लिची खाण्याचे विविध आरोग्यदायी फायदे...

मुळचं दक्षिण चीनमधील लिची हे फळ अनेकांना आवडतं. खायला गोड, रसाळ आणि जिभेला थंडावा देणारं असं हे फळ आहे. याला गुलाबी रंगाचं कवच आणि आत पांढरा रसाळ गर असतो. भारतात हे मे ते ऑक्टोबरमध्ये बाजारात मुबलक प्रमाणात आढळते. बिहार आणि पश्चिम बंगालमध्ये याची सर्वाधिक लागवड केली जाते. आज आपण याचे फायदे जाणून घेणार आहोत. ज्यांना पचनाशी संबंधित समस्या आहेत त्यांच्यासाठी लिची फळे फायदेशीर आहेत लिचीचा रस पिणे खूप फायदेशीर ठरू शकते, कारण यामुळे अस्वस्थतेची लक्षणे कमी होतात.



वजन कमी करण्यास मदत करते: लिची फायबरचा एक उत्तम स्रोत आहे, लिचीमध्ये कमीतकमी चरबी आणि कॅलरी असलेल्या पाण्याचे प्रमाण जास्त असते. वजन कमी करण्याच्या प्रवासात समाविष्ट करणे हे एक आदर्श फळ बनवते.

ते हाडे मजबूत करते. कारण लिचीमध्ये लोह, तांबे, कॅल्शियम, मॅग्नेशियम, फॉस्फरस, मँगनीज इत्यादी असतात. ही खनिजे कॅल्शियमचे शोषण वाढवतात आणि हाडांची ताकद वाढवतात. त्यामुळे हाडांची नाजूकता कमी होते.

लिचीमध्ये आढळणारे तांबे हे मानवी शरीरात लोहाइतकेच महत्त्वाचे आहे. लिची खाल्ल्याने लाल रक्तपेशींचे उत्पादन वाढते. हे वृद्ध लोकांसाठी उत्तम आहे, कारण ते योग्य रक्ताभिसरणास मदत करते.

लिची फळांच्या फायद्यांमध्ये उच्च रक्तदाब नियंत्रित करणे देखील समाविष्ट आहे. त्यात पोटॅशियम आणि कमी सोडियमचे प्रमाण आहे, जे शरीरातील द्रव राखते, जे चयापचय कार्यासाठी आवश्यक आहे आणि उच्च रक्तदाब. हे हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी ताण देखील व्यवस्थापित करते, ज्यामुळे रक्तवाहिन्यांमधून रक्त प्रवाह सुलभ होण्यास मदत होते.

लिचीमधील व्हिटॅमिन सी सामग्री रोगप्रतिकारक शक्ती व्यवस्थापित करण्यासाठी एक उत्तम फळ बनवते.

**लिची फळाचे इतर ज्ञात फायदे**

ते वृद्धत्व कमी करते. लिचीमध्ये आढळणारे व्हिटॅमिन सी फ्री रॅडिकल्सच्या प्रतिकूल प्रभावापासून संरक्षण करते. लिचीमध्ये असलेले पॉलीफेनॉल यकृताचे नुकसान कमी करू शकतात आणि मद्यपान टाळू शकतात चरबी यकृत रोग चरबी जमा होऊ शकते. लिचीमध्ये पॉलीफेनॉलचा समृद्ध स्रोत असल्याने असे म्हटले जाते की अभ्यासानुसार पॉलिफेनॉल मधुमेहाचे व्यवस्थापन करण्यास मदत करतात.

# प्रशासन व विक्रम संघटना यांच्या चर्चेतून योग्य तो निर्णय व्हावा

## खासदार धैर्यशील पाटील यांची भूमिका; आमदार रविशेठ पाटील यांच्या निवासस्थानी बैठक





**पेण : प्रतिनिधी**

मंगळवार ३ जून रोजी पेणचे मुख्यधिकारी जीवन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली न.प. कर्मचारी मोठा पोलीस बंदोबस्त घेऊन व जेसीबी पोकलेन यंत्रसामुग्री घेऊन विक्रम स्टँडवर कारवाई करण्यासाठी गेले असता आमदार रविशेठ पाटील याची निवासस्थानी झालेल्या बैठकीत खासदार धैर्यशिल पाटील यांनी हि कारवाई थांबिण्याची प्रशासन व विक्रम संघटना यांच्या चर्चेतून योग्य तो निर्णय व्हावा असे सांगितले

पेण नगरपालिकेने २० मे रोजी विक्रम मिनीडोअर चालक मालक संघटनेला अंतिम भुखंड १०० मधील विक्रम मिनीडोअरचा थांबवा हलविण्या संदर्भात २८ मे आणि २९ मे ला पोलीस बंदोबस्त येणार असल्याचे पत्र दिले होते. तसेच वाटाघाटीचे सुध्दा आमंत्रण दिले होते यावेळी विक्रम मिनीडोअर चालक मालक संघटनेच्या वतीने पेण नगरपालिकेसमोर ठिय्या आंदोलन करण्यात आले होते.

आज विक्रम चालक मालक संघटनचे जिल्हा अध्यक्ष विजय पाटील, विक्रम मिनीडोअर चालक मालक संघटनेचे तालुका अध्यक्ष कल्पेश पाटील आदी संघटनेचे पदाधिकारी यांनी आमदार रविशेठ पाटील याची निवासस्थानी भेट घेऊन हि कारवाई थांबिण्याची विनंती केली. यावेळी आमदार रविशेठ पाटील, मुख्याधिकारी जीवन पाटील, नायब तहसिलदार प्रसाद कालेकर विक्रम संघटनेचे पदाधिकारी व उपविभागीय पोलीस अधिकारी गजानन टोम्पे, पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांची बैठक झाली. यावेळी आंदोलन स्थळी खासदार धैर्यशिल पाटील यांनी भेट देऊन योग्य तो निर्णय झाल्याशिवाय प्रशासन व पोलिसांनी कारवाई करू नये असे आवाहन प्रशासनाला केले.

यावेळी रविशेठ पाटील यांच्या निवासस्थानी झालेल्या बैठकीत विक्रम चालक संघटनेने योग्य ती भूमिका घेऊन लवकरात लवकर प्रशासनाला त्यांचे म्हणणें कळवावे अशी चर्चा होऊन आजची कारवाई स्थगित केल्याचे मुख्याधिकारी जीवन पाटील यांनी जाहीर केले. यावेळी खासदार धैर्याशिल पाटील यांनी विक्रम संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना सर्व लाईनच्या रिक्षा चालकांनी आपसात बैठक घेऊन योग्य तो निर्णय घ्यावा जेणेकरून प्रशासनाची वारंवार होणारी कारवाई टाळता येईल जागे संदर्भात पेण न.प . प्रशासन हद्दीत कुठे कुठे गाड्या उभ्या करता येतील या संदर्भात चर्चा करावी यासाठी योग्य तो पाठपुरावा येथील आमदार रविशेठ पाटील, मी स्वतः खासदार या भूमिकेतून सर्वोतोपरी आपल्या पाठीशी राहीन परंतु लवकरात लवकर योग्य निर्णय होणे गरजेचे असून यासाठी संघटनेच्या पदाधिकारी व चालक मालक यांनी पुढाकार घेणे गरजेचे असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.

आज सकाळपासूनच पेण न.प प्रशासन व कर्मचारी मोठ्या पोलीस बंदोबत व यंत्र सामुग्रीसह विक्रम स्टँडवर तोडक कारवाई करण्यासाठी सज्ज झाले होते. परंतु आमदार रविशेठ पाटील व खासदार धैर्यशिल पाटील यांच्या मध्यस्थीमुळे आजची कारवाई स्थिगत करणे प्रशासनाला भाग पडल्यामुळे कारवाई साठी आणलेली यंत्रसामुग्री व पोलीस फौजफाटा याना तब्बल पाच तासांनी माघारी परतावे लागले.

# रोह्यात अडीच लाख रुपयांच्या दागिन्यांची चोरी

## दोन सह्या केलेले कोरे चेकसुद्धा पळवले

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील भुलेश्वर निरलॉन कॉलनी येथील श्रीकृष्ण नगर येथे सकाळी दहाच्या सुमारास रूम नंबर १०२ बी विंग वृंदावन सोसायटीमध्ये चोरट्याने एका गृहिणीच्या घरात प्रवेश करुन बंद घराचे कुलूप तोडून सोन्याचे दागिने २ लाख ६५ रुपयांचे दागिने चोरट्याने लंपास केले व शेजारी घराचे सुद्धा कुलूप तोडून चोरट्याने सही केलेले दोन कोरे चेक सुद्धा चोरले असल्यामुळे रोहा पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे

चोरट्या विरोधात रोहा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कपाटातील रोख रक्कम २,५०० रूफ्यांसह चोरट्याने एकूण २ लाख ६४ हजार पाचशे रुपयांची चोरी केली असून पुढील तपास रोहा पोलीस निरीक्षक मारुती पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली एस. एस. अधिकारी तपासीय अमलदार पाहत आहेत .


**Public Notice**

Notice is hereby given that the Share Certificate No.63 For 10 (Ten) Ordinary share beaning distinctive No.621 to 630 of Kamothe Pushp Meena co-o housing society Ltd Standing in the Names of Mr.Pintu Rajendraprasad Jaiswal and Mrs.Kanchan Pintu Jaiswal have been reported lost/ Stolen and that an application for issue duplicate certificate in respect there of has been made to the society at D-202,Pushp Meena co-o housing society Ltd ,Sector 10,Plot. No.30,Kamothe, Navi mumbai-410209, to Whom objection if any against issuance of such duplicate Share certificate Should be made within 14 days from the date of publication of this Notice.Share certificate is not Mortgaged nor any loan taken against the flat.

**Sd/-**
Mr.Pintu Rajendraprasad Jaiswal


# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सव पदार्पणानिमित्ताने वृद्धाश्रमात धान्य, खाऊ वाटप

## रोहा भाजप तालुकाध्यक्ष अमित घाग यांचा उपक्रम

**धाटाव : प्रतिनिधी**

रायगडचे माजी खासदार तथा दानशूर व्यक्तिमत्व असलेले रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त रोहा तालुक्यातील कालकाई वृद्धाश्रमात सोमवार (दि.२) रोजी धान्य व खाऊ वाटप करण्यात आले. रोहा तालुका अध्यक्ष अमित घाग यांच्या माध्यमातून हा उपक्रम राबविण्यात आला रामशेठ ठाकूर यांना सर्व वृद्धांनी शुभेच्छा देऊन त्यांना उदंड व निरोगी आयुष्य लाभो अशी सदिच्छा व्यक्त करण्यात आली.



रामशेठ ठाकूर यांनी नेहमीच गोर गरीब जनतेची सेवा करुन समाज कार्याची वसा जपला आहेच परंतु जी विकासकामे केलेली आहेत ती समाजीक कामे लोकहिताची राहिलेली आहेत . त्याचा सर्वात वेगळेपणा म्हणजे मदतीसाठी अपेक्षेने लोकांना जात ,पात, धर्म,पक्ष न विचारता शक्य होईल तेवढी मदत ते करतात त्यामुळे आज लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त आम्ही रोहा भाजपाच्या वतीने त्यांचे कार्य पोहचविण्यासाठी वृद्धाश्रमा उपक्रम राबविण्यात आला असे रोहा तालुका अध्यक्ष अमित घाग यांनी सांगितले.

या वेळी भाजपा रोठ खुर्द बुथ अध्यक्ष सचिन मोरे, बुथ अध्यक्ष राजेश मोरे, युवा वॉरियर संयोजक धिरज मोंडे, संकेत मोरे, ऋषिकेश माने, आयटी सेल संयोजक निखिल बोरेले, अमर वारंगे तसेच कालकाई वृद्धाश्रमाच्या सुनंदा मोहिते व भाजप पदाधिकारी उपस्थित होते.

### सावंतवाडी-दिवा एक्स्प्रेस थांब्याच्या वेळेत बदल

**रोहे :** सावंतवाडी रोड-दिवा एक्स्प्रेसला कळंबोली स्थानक येथे व तिरुवनंतपुरम नॉर्थ-भावनगर एक्सप्रेसच्या रोहा स्थानक येथील थांब्याच्या वेळेत बदल करण्यात आला आहे. दिनांक ०२.६.२०२५ पासून कळंबोली स्थानकावर सध्याच्या १९.२९ वाजता ऐवजी १९.०० वाजता पोहोचेल आणि १९.०१ वाजता सुटेल.


**उरण नगरपरिषद, उरण**
जिल्हा : रायगड
**प्रथम संक्षिप्त ई-निविदा सुचना क्रमांक उनप/बांवि/०१/२०२५-२६**

उरण नगरपरिषद क्षेत्रातील खालील कामाची संपूर्ण तपशिलासह सविस्तर ई - निविदा https://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| (१) | उरण नगरपरिषद हंधीतील उरण मोरा येथील मोहन स्टोअर्स ते राम मंदिर पर्यंतच्या मुख्य रस्त्याचे सिमेंट कॉक्रीटीकरण करणे. (द्रितीय संक्षिप्त ई-निविदा) | रु.४,२४,८७,४१८/- |
| (२) | उरण नगरपरिषद हद्दीतील उरण मोरा येथील दत्त मंदिर ते साई मंदिर पर्यंतच्या मुख्य रस्त्याचे सिमेंट कॉक्रीटीकरण करणे. (द्रितीय संक्षिप्त ई-निविदा) | रु. ४,२४,८७,४१८/- |
| (३) | उरण नगरपरिषद् क्षेत्रातील उरण नागांव रस्त्यापासून म्हातवली स.नं. ८/१/अ व स.नं. ८५ मधून जाणारा १२.०० मिटर रुंदीचा विकास योजनेतील रस्ता सिमेंट कॉक्रीटीकरण करणे. | रु.३,५२,१८,१०८/- |

तरी अर्हता प्राप्त इच्छुक निविदाकारांनी दिनांक ४-६-२०२५ ते १३-६-२०२५ या कालावधीत वरील संकेत स्थळावर रितसर निविदा अपलोड करावी.

दिनांक : ३/०६/२०२५
जा.क्र. उनप/बांवि/६८५/२०२५-२०२६

**सही/-**
**मुख्याधिकारी**
उरण नगरपरिषद, उरण



**जाहीर प्रसिध्दीकरण**

अक्षर एम्पोरिया गार्डन सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. कराडे खुर्द, ता. पनवेल, जि. रायगड., या संस्थेचा सन २०२५ ते २०३० या कालावधीतील पंचवार्षिक निवडणूकीसाठीचा निवडणूक कार्यक्रम प्रसिध्द करण्यांत येत आहे. सदर कार्यक्रमानुसार नामनिर्देशन पत्र स्विकृती दि. ०५/०६/२०२५ ते १०/०६/२०२५, नामनिर्देशन पत्र छानणी दि. ११/०६/२०२५, नामनिर्देशन पत्र माघारी दि.१३/०६/२०२५ ते २७/०६/२०२५ व आवश्यकतेनुसार मतदान दिनांक ०६/०७/२०२५ रोजी घेण्यांत येईल. तपशिलवार निवडणूक कार्यक्रम, निवडणूकीबाबत सूचना व अधिक माहीती तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांचे कार्यालयामध्ये पहावयास मिळेल याची संस्थेच्या सभासदांनी नोंद घ्यावी.

३/०६/२०२५

**सही/-**
**(अश्विनी शिंदे)**
निवडणूक निर्णय अधिकारी



**Wanted Teachers**

Shree Samarth Social & Educational Institute's

**SHREE SUVIDYA VIDYALAYA**

Sector 9, Plot No. 5, Kamothe. Tal-Panvel, Dist-Raigad

**Wanted Teachers - Primary & Secondary Section**

1. **English / Marathi & Hindi Teacher** - B.A./M.A. B.Ed. In Subject Specialty
2. **Mathematics Teacher -** B.Sc./M.Sc. B.Ed.
3. **Science Teacher -** B.Sc./M.Sc. B.Ed.
4. **Social Studies Teacher -** - B.A./M.A. B.Ed.

Apply with latest resume and passport size photo on Ssv.kamothe@yahoo.com

Also on Whatsapp No.
**8097752425 / 8879422816**


# माणगावात भरधाव बसची रिक्षाला धडक

## रिक्षाचालकाचा मृत्यू, तीन जण जखमी

**माणगाव : प्रतिनिधी**

भरधाव खाजगी बसची ऑटो रिक्षाला जोरदार धडक लागल्याने झालेल्या भीषण अपघातात रिक्षा चालकाला गंभीर दुखापत होऊन त्यामध्ये त्यांचा मृत्यू झाला तर या अपघातात ३ जण जखमी होऊन रिक्षाचा चक्काचूर झाला.



सोमवार दि. २ जून रोजी १० : ३० वाजण्याच्या सुमारास मुंबई - गोवा राष्ट्रीय महामार्गावर घडला.या अपघातातील जखमी अश्विनी दळवी व साईशा स्वप्नील दळवी (वय - ४) रा. ,कल्याण पूर्व यांचेसह मावशीच्या घरी जेवण करून मामा अशोक सोनार यांच्या रिक्षात बसून जात असताना मामा अशोक सोनार हे रिक्षा मागे घेऊन मुंबई - गोवा महामार्गाच्या जवळ येऊन थांबून महामार्गावरील गाड्या पाहत असताना मुंबई बाजूकडून महाड बाजूकडे जाणारी बसच्या चालकाने त्याच्या बस भरधाव वेगाने चालवून रस्त्याच्या डाव्या बाजूस खाली जाऊन उभ्या असलेल्या रिक्षाला धडक मारून अपघात केला.

या अपघातात रिक्षा चालक.अशोक सोनार (वय-६५) रा. माणगाव यांना गंभीर दुखापत होऊन त्यांना औषोधोपचारासाठी मुंबईकडे घेऊन जात असताना वाटेतच त्यांचा मृत्यू झाला. या अपघातात परी अनिल सोनार (वय-११) रा.जुने माणगाव,अश्विनी स्वप्नील दळवी (वय-३०) व साईशा स्वप्नील दळवी (वय - ४ ) दोन्ही रा.चक्कीनाका,कल्याण पूर्व हे तीन जण जखमी झाले.

बसचा चालक कालिदास कोकरे रा.कुभारमाठ,जि. सिंधुदुर्ग यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या अपघाताच्या गुन्ह्याचा अधिक तपास पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक बेलदार हे करीत आहेत.

# नायक सुभेदार रवींद्र विचारे यांचे भानंग गावात भव्य स्वागत

**तळा : प्रतिनिधी**

पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर आपल्या देशाने ऑपरेशन सिंदूर मिशन पुकारले यामधे भारताने विजय मिळविला.या मिशनमध्ये तळा तालुक्यातील भानंग गावचे सुपुत्र नायक सुभेदार रविंद्र विचारे सहभागी होते.

ते यशस्वी सेवा बजावून १ जून रोजी स्वतः च्या भानंग या गावी परतले असता गावात प्रवेश करतांना महिलांनी त्या दोघा उभयतांचे औक्षण केले आणि सर्व ग्रामस्थांच्या डोळ्यात आनंदाश्रू येऊन सर्वांनी भारत माता की जय असा जयघोष करून गावात मिरवणूक काढण्यात आली.

.यामुळे गावातील वातावरण देशभक्तीमय झाले होते.तदनंतर श्रीराधाकृष्णमंदिरात नायक सुभेदार



रविंद्र विचारे यांना शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.आपले स्वागत व सत्कार पाहून ते भारावून गेले.तसेच यावेळी भानंग गावचे सेवानिवृत्त सैनिक सुरेश वडके यांचाही सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमात भानंग गावचे ग्रामस्थ, मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते.


**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
पत्ता - कार्यकारी अभियंता, यांत्रिकी भांडार व विकास विभाग कळवा- ठाणे
ईमेल-eemsddkalwa@yahoo.co.in दुरध्वनीक्र ०२२-२५३७४७७०.

**ई निविदा सूचना क्र. १२ सन २०२५ २०२६**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, यांत्रिकी भांडार व विकास विभाग, कळवा-ठाणे, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरिता ई - निविदा बी - १ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) ई - निविदा मागवित आहेत. ई - निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथुन डाउनलोड करण्यात यावीत. सविस्तर ई निविदा सूचना व निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

तसेच निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, यांत्रिकी भांडार व विकास विभाग कळवा ठाणे यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| | | |
|---|---|---|
| १. | कामाचे नांव | हेटवणे मध्यम प्रकल्प कामार्ली ता.पेण जि. रायगड येथील वार्षिक सन २०२५- २०२६ विविध द्वारांचे वार्षिक परीचलनद्वारे व उच्चालकाचे नियमित देखभाल करणे. |
| | जिल्हा | रायगड |
| | निविदेची किंमत रुपये | रु.६५,९०,८८१/- |
| निविदा उपलब्ध कालावधी | | दिनांक:०६/०६/२०२५ ते दिनांक: १३/०६/२०२५ |
| निविदा उघडण्याचा दिनांक | | दिनांक : १६/०६/२०२५ |

जा.क्र. यांभाविवि/लेशा-२/१२४६/सन-२०२५
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
यांत्रिकी भांडार व विकास विभाग,
कळवा- ठाणे.
दिनांक-०२/०६/२०२५

**सही/-**
**(सं.ना. रोकडे)**
कार्यकारी अभियंता
यांत्रिकी भांडार व विकास विभाग
कळवा-ठाणे

विमाका/कोवि/२०२५-२०२६/५६



**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसी द्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्ती बरोबर तोंडी अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, पतसंस्थेचा, खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकांन बरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे - भिलवले, ता. खालापूर, जि. रायगड येथील शेतजमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.-पॉ. | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | रुपये | पैसे |
| १) सुनिता जयवंतराव देशमुख २) सुजितकुमार जयवंतराव देशमुख ३) कल्पना विक्रम जगताप | ८१ | २ ब | ०-६८-५० | ५ | ७० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
दिनांक :- ०४/०६/२०२५

**सही/-**
**ॲड. जयेश संभाजी म्हसे**

**कार्यालयीन पत्ता :-** ए-४, ए विंग, पहिला मजला, गणेशा अर्पाटमेंट, कर्जत नगरपालीका कार्यालय शेजारी, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१. मो.नं. ९०२८९८२२७७
ई मेल: adv.jayeshmhase@gmail.com

## निवडक

### सैनिक साजिद शेख यांचा गौरव

**पाली :** येथील साजिद लूखमान शेख यांनी देशासाठी सर्वस्व



योगदान दिले. त्यांची पाली येथे छत्रपती शिवाजी महाराज चौक – गांधी चौक, खालचा मोहल्ला अशी भव्य गौरव मिरवणूक काढण्यात आली. या सेवापूर्ती गौरव सोहळ्यास पाली सुधागड व रायगडातील आजी माजी सैनिक, देशप्रेमी उपस्थित होते. साजिद शेख यांनी कोलकत्ता, कुपवाडा, गुवाहटी, आसाम, लेह लदाख अशा ठिकाणी सैनिक म्हणून देशसेवा केली.

### मुकबधिर विद्यालयात मोफत प्रवेश

**रायगड :** रायगड जिल्हा व कोकण विभागातील कर्णबधिर मुलां–मुलींच्या शिक्षणाच्या सोयीसाठी शासनाने विद्यानगर–अलिबाग येथे शासकीय मुकबधिर विद्यालय सुरू केले आहे. या विद्यालयात ६ ते १६ वयोगटातील मुला–मुलींच्या इच्छुक पालकांनी आपल्या पाल्यांच्या प्रवेशासाठी अधिक्षक, शासकीय मुकबधिर विद्यालय, अलिबाग जि. रायगड यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा समाज कल्याण अधिकारी, रायगड जिल्हा परिषद, डॉ.शामराव कदम यांनी केले आहे. माहितीसाठी ९५९४३१३१७९ शिंदे, ७०३०३९००२० वेखंडे, ९९७०२५३४५ बोरकर यांच्याशी संपर्क साधावा.

### मिलिंद मोहिते सेवानिवृत्त



**मुरूड :** श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालय यशवंतनगर नांदगाव हायस्कूलमधील प्रयोग शाळा परिचर पदावर कार्यरत असणारे मिलिंद पर्वतराव मोहिते हे सेवानिवृत्त झाले आहेत. सहजीवन मंडळातर्फे त्यांचा निरोप समारंभ साजरा करण्यात आला होता. या वेळी संस्थेचे अध्यक्ष फैरोज घलटे, मुख्याध्यापक अर्चना खोत, पर्यवेक्षक प्रतीक पेडणेकर, संचालक कृष्णा अंबाजी, गणेश गाणार, मुश्ताक झोबंडकर, अस्लम हल्डे, माजी शिक्षक उदय खोत आदी उपस्थित होते.



**चौक : पोलीस उप विभागीय अधिकारी विक्रम कदम यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून त्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या वेळी खालापूर पोलीस निरीक्षक सचिन पवार, उपनिरीक्षक शिवाजी जुंदळे, उपसरपंच सुभाष पवार आदी उपस्थित होते.**

# माणगावमध्ये रब्बी हंगामातील भातपिकाला फटका

**माणगाव : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुक्यातील अनेक शेतकरी सध्या गंभीर संकटात सापडले आहेत. यंदाचे वर्षी ४० हेक्टर क्षेत्रावर रब्बी हंगामातील भातपीक उशिरा आलेल्या डोलवहाळ धरणाच्या कालव्याच्या पाण्यामुळे अजूनही शेतात उभे असून कापणीस तयार नाही. परिणामी पुढील खरीप हंगामातील भातपिकाची लागवड वेळेत करता येणार की नाही याबाबत शेतकऱ्यांमध्ये मोठी अनिश्चितता आहे. यंदाचे वर्षी पाणी सोडण्याच्या मुदती नंतर डोलवहाळ धरणातून कालव्यातून पाणी भातशेतीला उशिरा सोडल्यामुळे पिकांचे नियोजन कोलमडले आहे.



रब्बी हंगामासाठी शेतकऱ्यांनी मेहनतीने भात लागवड केली होती, परंतु वेळेवर पाणी उपलब्ध झाले नसल्याने पिकाची वाढ उशिरा झाली. आता उन्हाळ्याच्या शेवटच्या टप्प्यात भाताचे पीक शेतात उभे आहे आणि ते अजूनही कापणीस योग्य स्थितीत आलेले नाही. यंदा लवकरच पाऊस असल्यामुळे शेतकऱ्यांना खरीप हंगामाच्या मशागतीसाठी पुरेसा वेळ मिळणार नाही. त्यातच अवकाळी पावसाने माणगाव तालुक्यातील कालव्याच्या पाण्यावरील सुमारे ४० हेक्टर भातपिकाला फटका दिल्याने खरीप हंगामासाठी शेत तयार करणे, व त्याच जमिनीवर पुन्हा भात लागवड करणे शेतकऱ्यापुढे मोठे प्रश्नचिन्ह उभारले आहे. यासोबतच पावसाळा तोंडावर येत असताना रब्बी पीक शिल्लक असल्याने शेतकरी दुहेरी संकटात सापडला आहे. एका बाजूला दोन पिके घेणाऱ्या शेतकऱ्याला सध्याच्या पिकाची कापणी करायची आहे, तर दुसरीकडे खरीपासाठी शेतीची पूर्वतयारी करायची आहे. यामुळे आर्थिक व मानसिक तणावात भर पडली आहे. शेतकऱ्यांच्या मते, जलसंपदा विभागाने वेळेवर पाणी सोडले असते, तर ही परिस्थिती टळली असती. प्रशासनाच्या नियोजनाच्या अभावामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत असून याबाबत नुकसानभरपाई मिळावी अशी मागणी जोर धरू लागली आहे.

स्थानिक कृषी अधिकाऱ्यांनी या परिस्थितीची गंभीर दखल घेऊन तत्काळ उपाययोजना कराव्यात, अशी मागणी शेतकरी संघटनांकडून केली जात आहे. वेळेवर उपाययोजना झाली नाही, तर याचा फटका संपूर्ण खरीप हंगामाला बसू शकतो याबाबत शेतकऱ्यांना भीती वाटत आहे. रब्बी भाताचे पीक मार्च–एप्रिलमध्ये तयार होते, पण त्या वेळी उन्हाळ्याची तीव्रता, पाण्याची कमतरता आणि मजुरांची टंचाई या गोष्टी पीक काढणीला विलंब घडवतात.

#### उत्पादन आणि उत्पन्नावर थेट परिणाम

खरीप हंगामासाठी मेपासूनच जमिनीची नांगरणी, खते व बियाण्यांची व्यवस्था, पाण्याचा स्रोत निश्चित करणे आदी कामे सुरू करावी लागतात. अशा स्थितीत एकाच वेळी दोन हंगामांची जबाबदारी पार पाडणे म्हणजे आर्थिक व मानसिक ताण निर्माण करणारी गोष्ट ठरते. याशिवाय रब्बी पीक वेळेवर न काढल्यास पुढील हंगामासाठी लागणारी शेतीची मशागत होऊ शकत नाही, परिणामी खरीप पीक वेळेवर लावता येत नाही. याचा थेट परिणाम उत्पादनावर आणि उत्पन्नावर होतो.

## महावितरणच्या साहित्याची रामराज परिसरात चोरी

**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबाग कार्यक्षेत्रातील महावितरण महाराष्ट्र राज्य वितरण कंपनी शाखा रामराज अंतर्गत येत असलेल्या मालाडे व तळवली येथून धातूची कॉईल, कोअर व अल्युमिनियम धातूची कंडक्टर केबल आदी साहित्य चोरी प्रकरणी रेवदंडा पोलीस ठाणे येथे अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, रेवदंडा पोलीस ठाणे हद्दीत २४ मे रोजी सकाळी दहा ते ३० मे सकाळी दहाचे दरम्यान अलिबाग तालुक्यातील कार्यक्षेत्रातील महावितरण महाराष्ट्र राज्य वितरण कंपनी शाखा रामराज अंतर्गत येत असलेल्या मालाडे गावाचे हद्दीतून विजबिल ग्राहकांचे शेतीकरीता बसविण्यात आलेल्या १६ के.व्ही. मतेचे स–व्ही डी सी ट्रान्सफार्मर क्र. २०००२ मधील अंदाजे ५० कि.ग्रॅम वजनाची १० हजार रूपये किमंतीची अल्यूमिनियम धातूची कॉईल व कोअर, तळवली गावाचे हद्दीतील वीज ग्राहक यांचेकडे विद्युत पुरवठा करणारे पोल वरील अंदाजे ६० कि.ग्रॅम वजनाची अंदाजे १२ हजार रूपये किमंतीची अल्युमिनियम धातूची कंडक्टर केबल, असा एकूण २२ हजार रूपये किमतीचा विद्युत साहित्य मुद्देमाल कोणीतरी अज्ञाताने चोरीस नेल्याची तक्रार रेवदंडा पोलीस ठाणे येथे नोंदविण्यात आली आहे.

याबाबत रेवदंडा पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास रेवदंडा पोलीस ठाण्याचे सहाय्यक फौजदार दिनेश पिंपळे हे करत आहेत.

## माणगावात रक्तदान शिबिरास प्रतिसाद

### ५१ बॅगा रक्त संकलित

**माणगाव : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील रक्त पिढ्यांमधील रक्ताचा तुटवडा भरून काढण्यासाठी काळाची गरज ओळखून माणगाव शिवजयंती उत्सव व रक्तदान शिबिर सेवाभावी संस्थेतर्फे रक्तदान हेच खरे सर्व श्रेष्ठ दान समजून रविवार १ जून २०२५ रोजी सकाळी ९ ते दुपारी २ यावेळत माणगाव उपजिल्हा रुग्णालयात शासकीय रक्तपेढी अलिबाग यांच्या सौजन्याने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

शिबिराचे उद्घाटन माणगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे यांच्याहस्ते करण्यात आले. या शिबिरात ५१ रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान करून उत्साहात शिबिर झाले. सदर शिबिरास माणगाव उपजिल्हा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ.अरुणा पोहरे, डॉ.अभिजित मेहता, डॉ.श्रीकांत वैद्य, सामाजिक कार्यकर्ते नामदेव शिंदे, विष्णू सावंत, देगावचे उपसरपंच दिनेश गुगले, अॅड. केदार गांधी, अॅड. पुंडलिक मालोरे,



शरद मोरे, कृष्ण दिवेकर, बाळा पवार आदी मान्यवरांसह जिल्हा शासकीय रुग्णालय अलिबाग व माणगाव उपजिल्हा रुग्णालय यांनी आयोजकांचे भरभरून कौतुक केले. या वेळी शिबिरास भेट देण्यासाठी आलेल्या सर्व मान्यवरांचे तसेच रक्तदात्यांचे संस्थेकडून स्वागत करण्यात आले.

शिबीर यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी शासकीय रक्तपेढी अलिबागचे डॉ.अद्वैत दारशेतकर, हेमकांत सोनार, मनिषा नवाळे, निलिमा जिरांगे, (रक्तकेंद्र तंत्रज्ञ) नवनाथ अळ्ळी (समाजसेवा अधिक्षक) विशाल भगत (अधिपरिसेवक), नम्रता करंगगुटकर, अश्विनी कोकणी, पल्लवी ठाकरे, महेश घाडगे, मंगेश पिंगळा यांनी रक्त संकलनाचे काम पाहून माणगाव शिवजयंती उत्सव व रक्तदान शिबीर सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष सलीम शेख, सचिव शंकर शिंदे, खजिनदार अरुण क्षीरसागर, शिबीर समितीच्या पदाधिकारी विनया जाधव, शुभांगी सोनावणे, अपूर्वा जंगम, कल्पना पाखुर्डे, सल्लागार विजय मेथा, सिराज परदेशी, निर्मलसिंग रंधावा, संदीप नागे, राजेंद्र खाडे, मजीद हाजीते, आजेश नाडकर, भालचंद्र खाडे, प्रा. भारत पवार, सतीश काळे, किशोर झेमसे, राहुल दसवते, मिलिंद शेलार, विशाल पवार, प्रसाद धारिया, सचिन शरद देसाई, बशिर करेल, झिशान परदेशी, शाहरुख अफ़वारे, सचिन वाघ सर्व पदाधिकारी व सदस्य तसेच उपजिल्हा रुग्णालय माणगावच्या मनीषा नवाले व त्यांचे सहकारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

## ‘माथेरानची राणी’ यंदा लवकरच पावसाळी रजेवर

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरानची राणी अर्थात मिनिट्रेन यंदा लवकरच पावसाळी रजेवर गेली असल्याचे बोलले जात आहे. माथेरानची शान असलेली मिनीट्रेन पावसामुळे बंद ठेवण्याचा निर्णय घेतल्याची माहिती मिळत आहे.२६ मे रोजी कोसळलेला मुसळधार पाऊस व त्यानंतर पण जोरदार झालेल्या पावसात सुरक्षेचा उपाय म्हणून ही मिनीट्रेन बंद ठेवली होती, मात्र एक आठवडा उलटूनही मिनीट्रेन सुरू होण्याचे चिन्ह दिसत नसल्याने आता थेट पावसाळा संपल्यानंतर माथेरानची राणी ऑक्टोबर महिन्यात धावेल, अशी माहिती मिळत आहे.



मुंबई–पुण्यापासून हाकेच्या अंतरावरील पर्यटनस्थळ माथेरान मध्ये येण्यासाठी दोन मार्ग असून त्यापैकी एक मिनिट्रेनचा आहे. लहानांपासून जेष्ठांपर्यंत मनाला भुरळ घालणारी ही माथेरानची राणी या सुंदर पर्यटन स्थळासाठी वरदान ठरलेली आहे. याच माथेरानच्या राणीच्या मोहापायी हजारो पर्यटक या पर्यटनस्थळी येत असतात. दरवर्षी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर १५ जूनपासून १५ ऑक्टोबर पर्यंत मिनीट्रेनची सेवा बंद ठेवली जाते.

नेरळ ते माथेरान हा २१ किलोमीटरचा प्रवास असून त्यातील १८.५ किलोमीटरचा प्रवास डोंगरातून आहे. त्यामुळे पावसाळ्यात कायम दरडी कोसळण्याची भीती असते. शिवाय मोठ्या प्रमाणात धुके पडते. त्यामुळे प्रवाशांची सुरक्षितता लक्षात घेऊन पावसाळ्यात माथेरानच्या राणीला सक्तीची विश्रांती दिली जाते.मात्र यंदा पावसाचे आगमन २६ मे रोजी झाले. दोन दिवस याठिकाणी जोरदार पर्जन्यवृष्टी झाली. त्यामुळे स्थानिक पातळीवर तातडीने मिनीट्रेन सेवा बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला.

तेव्हापासून एक आठवडा झाला तरी मिनीट्रेन सुरू झालेली नाही. शिवाय पावसाळा सुरू झाला आहे. त्यामुळे तात्पुरती बंद ठेवलेली मिनीट्रेनची सेवा पावसाळा संपेपर्यंत बंद ठेवण्याचा निर्णय घेतल्याची माहिती मिळत आहे, मात्र दरवर्षी प्रमाणे पावसाळ्यात माथेरान ते अमनलॉज स्टेशन अशी शटल सेवा दररोज नियमित वेळेनुसार सुरू राहणार आहे.

## अलिबाग येथे १६ जून रोजी डाक अदालत

**रायगड : रामप्रहर वृत्त**

अधीक्षक डाकघर रायगड विभाग, अलिबाग यांचे कार्यालयाद्वारे १६ जून २०२५ रोजी, दुपारी ठीक २ वाजता डाक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.

तसेच या डाक अदालतीमध्ये रायगड विभागातील डाक सेवेसंबंधीत तक्रार/समस्या ज्याचे निवारण ६ आठवडा कालावधीत झालेले नाही, अश्या टपाल, स्पीडपोस्ट, काऊंटर सेवा, बचत बँक, मनीऑर्डर संबधित तक्रारी विचारात घेतल्या जाणार आहेत.

या तक्रारीत सविस्तर माहितीबाबत ज्या अधिकाऱ्याकडे मूळ तक्रार दाखल केली त्या अधिकाऱ्याचे नाव व हुद्दा इत्यादी असणे आवश्यक आहे. इच्छूक ग्राहकांनी आपली तक्रार दोन प्रतीत सुनील थळकर, अधीक्षक डाकघर रायगड विभाग यांचेकडे १० जून २०२५ रोजीपर्यंत पोहचेल अश्या बेताने पाठवावी, असे आवाहन अधीक्षक डाकघर, रायगड विभाग अलिबाग यांनी केले आहे.

## फणसवाडीमध्ये मोफत नेत्रचिकित्सा शिबिर

**कर्जत : प्रतिनिधी**

मांडवणेनजीकच्या फणसवाडीमध्ये लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट पनवेल आणि जागृती कष्टकरी संघटना कर्जत मांडवणे यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात ११५ जणांची नेत्र तपासणी करण्यात आली.

डॉ. हळदीपूरकरांच्या लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्टच्या विनोद पाचघरे यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. जागृत कष्टकरी सघंटनेचे अनिल सोनवणे, केशव वाघमारे आदी उपस्थित होते. या शिबिरात डॉ. नुतन पोखरकर, डॉ. श्रद्धा मामीडवार, ऑप्टोमेट्रीस्ट दिक्षा पाटील, अस्मीता रूठे यांनी नेत्र चिकित्सा केली.

११५ रुग्णांच्या तपासणीत अठरा जणांच्या डोळ्यात मोतीबिंदू दोष आढळून आला. त्यांच्यावर पनवेल येथे शस्त्रक्रिया होणार आहे. मोतीबिंदू शस्त्रक्रियेकरिता पनवेल येथे गाडीत घेऊन जाण्याची सोय केली आहे. अल्पदरात चष्मे देण्यात आले.




## एसटी महामंडळाचा वर्धापन दिन पेण आगारात साजरा

**पेण : प्रतिनिधी**

प्रवासी आमचे दैवत असल्याने जास्तीत जास्त चांगली सेवा त्याला कशी देता येईल याचा सातत्याने प्रयत्न एसटी महामंडळ करीत असते व यापुढेही करत राहील असा आत्मविश्वास एसटी रायगड विभागाचे विभाग नियंत्रक दीपक घोडे यांनी पेण आगारात एसटीच्या ७७व्या वर्धापन दिनानिमित्त झालेल्या कार्यक्रमात व्यक्त केला.



एसटीचा ७७ वा वर्धापन दिन पेण आगारात मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. ज्येष्ठ प्रवासी विलास पाटील यांच्या शुभहस्ते या कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. यंत्र अभियंता संदीप शिंदे यांनी सर्व प्रवासी, कर्मचारी वर्गाला वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या.

प्रवास असाच अखंडीत सुरू राहण्यासाठी रा.प. महामंडळात कार्यरत असलेल्या सर्व कर्मचारी यांनी निष्ठेने व आत्मियतेने आपले दैनंदिन कामकाज अत्यंत प्रामाणिकपणे पार पाडल्यास आपल्या लालपरीस सुवर्ण दिवस नक्कीच येतील अशी आशा रायगड विभागीय लेखाधिकारी विशाखा खोपडे ढमाले यांनी व्यक्त केली.


या कार्यक्रमास एसटी कामगार संघटनेचे पेण आगार सचिव बी.एम.बांगर कोषाध्यक्ष आशा घोलप व समस्त पेण आगारातील कर्मचारी वृंद उपस्थित होते. पेण आगाराच्या आगार व्यवस्थापक अपर्णा वर्तक यांनी या कार्यक्रमाचे नियोजन केले होते. शेवटी श्रीमती वर्तक यांनी आभार प्रदर्शन करून कार्यक्रम संपला असे जाहीर केले.

## कर्जत आगारात एसटी महामंडळाचा वर्धापन दिन

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत आगारात एसटी महामंडळाचा ७७वा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. या वेळी आगाराची सजावट, रांगोळी तसेच प्रवाशांच्या हस्ते केक कापून सर्व प्रवाशांना गुलाबाची फुले, पेढे वाटून आनंद व्यक्त करण्यात आला.

विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी सुहास कांबळे, प्रभारी आगार व्यवस्थापक देवानंद मोरे, सहाय्यक वाहतूक निरीक्षक महादेव पालवे, वाहतूक नियंत्रक संजय कोंडार, विलास बागुल, दीपक देशमुख, लेखकार राठोड तसेच मेधा भरकले अनुजा सुरवकर नितीन कोळी आदी एसटी महामंडळाचा वर्धापन दिन साजरा करण्यासाठी उपस्थित होते.



## विद्यार्थिनींना सायकलचे मोफत वाटप



**मुरूड : प्रतिनिधी**

वरदाइ चॅरिटेबल ट्रस्टतर्फे खासदार सुनील तटकरे, महिला व बालकल्याण सभापती अदिती तटकरे माजी आमदार अनिकेत तटकरे यांच्या माध्यमातून समाजातील गरीब शालेय विद्यार्थिनीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे काकळघर व काशीद ग्रामपंचायत हद्दीमधील सुमारे शंभर विद्यार्थिनीसाठी मोफत सायकल वाटप करण्यात आली आहे.

गरीब समाजातील शालेय मुलींना सायकलीचे मोफत वाटप करताना मुरूड तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष फैरोज घलते, रायगड जिल्हा सोशल मिडिया सेलचे जिल्हा उपाध्यक्ष हसमुख जैन, कृषी उत्मपन्न बाजार समितीचे चेअरमन मनोज भगत, सरपंच हर्षद महाडीक,माजी सरपंच मनीष नांदगावकर, माजी सभापती बाबू नागावकर, बाबू काबळे, सचिन पाटील, संजय महाडिक आदी मान्यवर या वेळी मोठ्या संखेने उपस्थित होते.

या वेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे कार्यकर्ते यांनी अथक परिश्रम घेत समाजातील गरीब व गरजू विद्यार्थिनी शोधून काढून त्यांना मोफत सायकल प्रदान करण्यात आली. या वेळी शालेय विद्यार्थिनी यांनी समाधान व्यक्त केले असून पालकांनी हा उपक्रम राबवल्याबद्दल आभार मानले.

# पॉवरलिफ्टिंग राज्य इक्विपड स्पर्धेत रायगडला सांघिक विजेतेपद



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पालघर येथे झालेल्या राज्यस्तरीय इक्विपड पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत रायगड जिल्हा संघाने सब ज्युनिअर महिला गटाचे सांघिक विजेतेपद पटकावले. त्याचबरोबर स्पर्धेच्या विविध गटात खेळाडूंनी सहा सुवर्ण, सहा रौप्य आणि एक कांस्य अशी एकूण १३ पदकांची कमाई केली आहे.

या यशाबद्दल पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशन रायगडचे अध्यक्ष गिरीश वेदक, सेक्रेटरी अरुण पाटकर, सहसेक्रेटरी सचिन भालेराव, कार्याध्यक्ष यशवंत मोकल, खजिनदार राहुल गजरमल, कार्यकारिणी सदस्य सुभाष टेंबे, संदीप पाटकर, मानस कुंटे, माधव पंडित, दत्तात्रय मोरे, सुभाष भाटे यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले व पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या.


राज्य संघटनेचे सेक्रेटरी शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त संजय सरदेसाई आणि शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त सतीश पाताडे यांनी खेळाडूंच्या मेहनतीचे हे यश असल्याचे सांगत त्यांचे कौतुक केले.

या स्पर्धेत पॉवरलिफ्टिंग रायगड संघाचे व्यवस्थापक म्हणून प्रवीण भगत (अलिबाग) आणि सहाय्यक म्हणून प्रथमेश भालेकर (कर्जत) यांनी जबाबदारी बजावली.

**पदकविजेते खेळाडू**

सुवर्ण : गणेश तोटे (सिनिअर स्पर्धा), गायत्री बडेकर महेश पाटील (मास्टर स्पर्धा), आचल राजभर (सब ज्युनिअर स्पर्धा), अंजली येवले व लावण्या भगत ज्युनिअर स्पर्धा); रौप्य : संतोष गावडे (मास्टर स्पर्धा), गायत्री बडेकर, गार्गी मसुरकर, जान्हवी बडेकर, प्रितेश बांगर, कुशल घारे (ज्युनिअर स्पर्धा); कांस्य : हर्षल देशमुख (ज्युनिअर स्पर्धा).

## जलतरण स्पर्धेत अनय गाडगेच्या पदकांचा 'चौकार'



**रोहा : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील धाटाव येथील जे.एम. राठी इंग्लिश स्कूलचा विद्यार्थी अनय रोहित गाडगे याने पुणे येथे आयोजित राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेत चार पदके पटकावली. यामध्ये तीन सुवर्ण व एक रौप्यपदकाचा समावेश आहे.

अनय गाडगे याने पुणे येरवडा येथे विभागीय क्रीडा संकुलात झालेल्या राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेत सहभागी होत १२ वर्ष वयोगटात घवघवीत यश संपादन केले. त्याने २०० मी. आयएम, ५० मी. फ्री स्टाईल, ५० मी. बटरफ्लाय या तीन प्रकारात सुवर्णपदक, तर ५० मी. ब्रेस्ट स्ट्रोकमध्ये रौप्यपदक प्राप्त केले.

अनयला प्रशिक्षक भूषण शिर्के व भूषण म्हात्रे यांचे विशेष मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले. या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक श्री. मुळे, उपमुख्याध्यापक श्री. माने यांच्यासह शाळेचे शिक्षक, कर्मचारीवृंद, पालक व विद्यार्थी या सर्वांनी अनयचे अभिनंदन केले.



## खारघर डॉक्टर्स असोसिएशनची चॅम्पियन लीग उत्साहात

**कर्जत : रामप्रहर वृत्त**

खारघर डॉक्टर्स असोसिएशनच्या वतीने खारघर चॅम्पियन लीग पर्व दुसरे स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. यामध्ये पुरुषांकरिता व्हॉलीबॉल, वॉटरपोलो व टर्फ क्रिकेट, तर महिलांकरिता थ्रो बॉल, डॉज बॉल व टर्फ क्रिकेट अशा खेळांचे सामने रंगले.

खारघर से. ३८ येथे झालेल्या या लीगचे उद्घाटन रायगड मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. आशुतोष कुळकर्णी, कोषागार डॉ. कुमार ओसवाल, स्पोर्ट्स सेक्रेटरी डॉ. निलेश म्हात्रे व डॉ. शर्वाणी कुळकर्णी यांच्या हस्ते झाले. सूत्रसंचालन डॉ. अंजू धर व डॉ. सविता शर्मा यांनी केले.

लीग यशस्वी करण्यासाठी खारघर डॉक्टर्स असोसिएशनच्या सेक्रेटरी डॉ. ज्योती पचौरी, कोषाध्यक्ष डॉ. शालिनी गोरे, उपाध्यक्ष डॉ. विवेक तिवारी, स्पोर्ट्स सेक्रेटरी डॉ. रोहित चव्हाण, ज्वाईंट स्पोर्ट्स सेक्रेटरी डॉ. प्रीत पटेल, डॉ. मनिषा माटकर, डॉ. सारिका म्हात्रे, डॉ. गौरव ठाकूर, डॉ. विनय सिंग, डॉ. रामकृष्ण क्षार यांनी परिश्रम घेतले. सत्य साई संजीवनी हॉस्पिटलचे चेअरमन डॉ. श्रीनिवासन यांनी जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल असोसिएशनच्या वतीने त्यांचे विशेष आभार मानण्यात आले.

## बॉक्सिंग चॅम्पियनशिपमध्ये प्रभात पोकळेने जिंकले सुवर्णपदक



**रोहा : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील खारापटी येथील प्रभात प्रलोभ पोकळे याने नेपाळमध्ये झालेल्या मिक्स बॉक्सिंग चॅम्पियनशिप २०२५ या स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले. त्याचे अभिनंदन होत आहे.

प्रभात हा खारापटी येथील व श्री धावीर महाराज रोहा रिक्षा चालक मालक संस्थेचे सभासद प्रलोभ पोकळे यांचा मुलगा आहे. त्याने नेपाळमधील काठमांडू येथे झालेल्या पहिल्या अशियायी मिक्स बॉक्सिंग चॅम्पियनशिप २०२५ स्पर्धेत भारताचे नेतृत्व करून सुवर्णपदक प्राप्त केले. या स्पर्धेत नेपाळ, भारत, भूतान, बांगलादेश, श्रीलंका, इराण, अफगाणिस्तान, इराक आणि थायलंड या देशांतील २५०हून अधिक खेळाडूंनी सहभाग घेतला होता.

प्रभात याची इंग्लंडमध्ये होणाऱ्या आंतरराष्ट्रीय मिक्स बॉक्सिंग चॅम्पियनशिप स्पर्धे साठी निवड झाली आहे. या यशाबद्दल श्री धावीर महाराज रोहा रिक्षा चालक मालक संस्थेचे अध्यक्ष लीलाधर मोरे, उपाध्यक्ष रूपेंद्र मळेकर आदींनी प्रभातचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



















## आरडीसीएतर्फे पंच प्रशिक्षण शिबिर व परीक्षा

**अलिबाग** : रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन (आरडीसीए)च्या वतीने जिल्ह्यातील क्रिकेट पंचांसाठी मार्गदर्शन शिबिराचे व त्यानंतर पंच परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर १०० दिवसांचे असून प्रत्यक्ष कार्यशाळा शिबिर व ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येणार असून शिबिरानंतर पंचांची लेखी व प्रॅक्टिकल स्वरूपात परीक्षा सप्टेंबरमध्ये घेतली जाईल.

प्रशिक्षण शिबिरासाठी तज्ञ प्रशिक्षक म्हणून माजी रणजीपटू व बीसीसीआयचे विद्यमान पंच हर्षद रावले, एमसीएचे पंच राजन कसबे व क्रिकेट नियमांचे तज्ज्ञ नयन कट्टा मार्गदर्शन करणार आहेत. ५ जूनपर्यंत इच्छुक पंचांनी गुगल फॉर्मद्वारे आपली नोंदणी करावी. अधिक माहितीसाठी सहसचिव जयंत नाईक (९५६१०९९७३५), सदस्य ॲड. पंकज पंडित (८१४९२५२८२९), प्रदीप खलाटे (८७६७९५९९६२) यांच्याशी संपर्कसाधावा.









दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com